
ठाणे, गुरुवार दि. ४ जुलै २०२४ वर्ष : १३, अंक : ६७ , पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

दैनिक महाराष्ट्र सम्राट
सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®
मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे
संपादक : चंद्रकांत भोईटे

अग्रलेख
**विधानपरिषदेची प्रतिष्ठेची लढाई**
राज्यातील विधानपरिषदेच्या ११ जागांसाठी दि.१२ जुलै रोजी होणाऱ्या निवडणुकीसाठी १२ उमेदवार रिंगणात असणार आहेत. महाविकास आघाडीकडून......पान २ वर


टीम इंडिया परतीच्या मार्गावर
...पान ३ वर

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com

**तापमान**
कमाल ३६° से | किमान २९° से

**बाजार**
सोने ७१,६०० | चांदी ८७,३९०

**डोकं खाजवा** –अशोक सुतार



महागाई वाढली म्हणून नाराज का होता? महागड्या वस्तू घेण्याची क्षमता वाढवली तर आपला देश श्रीमंत म्हणून गणला जाईल.

# नवीन ठाणे रेल्वे स्थानकाच्या कामाला मिळणार गती

**ठाणे : नवीन ठाणे रेल्वे स्थानक परिचलन क्षेत्रातील काम रेल्वे करेल तर परिचलन क्षेत्राबाहेरील काम ठाणे स्मार्ट सिटी करेल, असा निर्णय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी घेतला आहे. या निर्णयामुळे रेल्वे स्थानक उभारणी कामाला गती मिळणार असून त्याचबरोबर ठाणे महापालिकेचे अंदाजे १८५ कोटी रुपये वाचणार आहेत.**

- स्थानकाचे काम रेल्वे विभाग करणार
- ठाणे महापालिकेचे वाचणार अंदाजे १८५ कोटी




**ठाणे आणि मुलुंड रेल्वे स्थानकातील गर्दीचा भार कमी करण्यासाठी नवीन रेल्वे स्थानकाची उभारणी करण्यात येत आहे.**

ठाणे मनोरूग्णालयाच्या जागेत बांधण्यात येणाऱ्या नवीन रेल्वे संदर्भात रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या उपस्थितीत बुधवारी रेल भवन येथे महत्वाची बैठक झाली. या बैठकीत महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी या प्रकल्पाविषयीची पार्श्वभूमी मांडत या प्रकल्पामुळे ठाणे शहराला कसा फायदा होणार आहे याची माहिती दिली. त्यानंतर खासदार डॉ. श्रीकांत शिंदे आणि नरेश म्हस्के यांनी परिचलन क्षेत्रामध्ये जी कामे करण्यात येणार आहेत, ती सर्व कामे रेल्वे मंत्रालयाने त्यांच्या निधीमधून करण्याची मागणी केली. ही मागणी मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मान्य केली. रेल्वे परिचलन क्षेत्रामध्ये करण्यात येणारी कामे ही रेल्वे मंत्रालय त्यांच्या निधीतून करेल. या कामासाठी भविष्यात होणारी भाववाढ आणि त्या कामासाठी लागणारा अतिरिक्त निधीही रेल्वे मंत्रालय करेल अशी ग्वाही त्यांनी दिली. (पान २ वर)



ठाणे मनोरूग्णालयाच्या जागेत बांधण्यात येणाऱ्या नवीन रेल्वे संदर्भातील निवेदन काल, बुधवारी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे आणि खासदार नरेश म्हस्के यांनी रेल्वे मंत्री ना. अश्विनी वैष्णव यांना दिले. यावेळी महापालिका आयुक्त सौरभ राव, अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी उपस्थित होते.

## लाडकी बहीण योजना आणखी सुलभ...

# लाडकी बहीण योजनेत एका कुटुंबातील किती महिलांना लाभ मिळणार?

**फडणवीसांचं विधिमंडळात उत्तर**



मुंबई : राज्य सरकारच्यावतीने अर्थमंत्री अजित पवार यांनी नुकतेच विद्यमान राज्य सरकारचा शेवटचा अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पातून अर्थमंत्र्यांनी अनेक मोठ्या घोषणा केल्या आहेत. त्यामध्ये, महिला, शेतकरी आणि गृहिणींसाठी महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. त्यापैकी सर्वात मोठा आणि क्रांतीकारी (पान २ वर)

**अर्ज भरताना त्रासदायक ठरत असलेल्या अटी रद्द करण्यात आल्या आहेत.**

- आदिवास प्रमाणपत्राची अट शिथील करण्यात आली आहे.
- ऑगस्टमध्ये अर्ज केला तरी १ जुलैपासून अनुदान मिळणार आहे.
- परराज्यातील विवाहित महिलांनाही याचा लाभ घेता येईल.
- एका कुटुंबातील २ महिलांना योजनेचा लाभ घेता येणार आहे.
- ५ एकर शेतीची अट वगळण्यात आली आहे.
- १५ वर्षापूर्वीचं रेशनकार्ड, मतदान ओळखपत्र, शाळा सोडल्याचा दाखला, जन्म दाखला यापैकी एक पुरावा दिला तरी अर्ज भरता येणार आहे.

**तर सेतू केंद्र रद्द होईल-** या योजनेच्या अंमलबजावणीसाठी मदत करावी म्हणून अंगणवाडी सेविका आणि सेतू केंद्रांना प्रति व्यक्ती किंवा प्रती अर्जासाठी ५० रुपये राज्य सरकार देणार आहे. या वरचे पैसे जर कोण्या सेतू केंद्राने घेतले, तर त्यांचं सेतू केंद्र रद्द करण्यात येईल, अशी तंबीच गृहमंत्र्यांनी विधानपरिषदेत बोलताना दिली. तसेच, यासंदर्भात तशी ऑर्डर काढली आहे, असेही त्यांनी सांगितले.

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी अडवणूक, दिरंगाई, पैशांची मागणी केल्यास कठोर कारवाई – मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचना

(सविस्तर वृत्त पान २)

- जिल्हाधिकाऱ्यांनी संपूर्ण प्रक्रियेवर लक्ष ठेवावे
- दलाल अजिबात खपवून घेतले जाणार नाहीत

**थोडक्यात घडामोडी**



## रघुनाथ स.गोलवड यांची पोलीस उपनिरीक्षक पदी बढती

पालघर जिल्ह्यातील जव्हार या आदिवासी बहूल तालुक्यातील मेढा या गावचे सुपूत्र रघुनाथ सखाराम गोलवड हे अत्यंत हालाखीच्या प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत शिक्षण घेवून पोलीस दलात रुजू झाले. रघुनाथ गोलवड हे आदिवासी समाजातील असून त्यांची सर्व सामान्यांप्रमाणे श्रध्दाळू असून सर्वांसाठी सर्वतोपरी सहकार्याची आणि परोपकाराची नेहमीच भुमिका असते. नुकतीच त्यांची भिवंडी येथे वाहतूक विभागात पोलीस उपनिरीक्षक म्हणून बढती मिळाली आहे. त्यांच्या पदोन्नतीने आप्तेष्ट, नातेवाईक, मित्र तसेच सर्व स्तरांवरुन अभिनंदन आणि कौतुकांचा त्यांचावर वर्षावर होत आहे.

## फक्त सरकारी कार्यालयात स्मार्ट मीटर–फडणवीस

मुंबई – वीजेची स्मार्टमीटर बसविण्यावरुन सत्ताधारी आणि विरोधकांत आरोपप्रत्यारोप सुरु आहेत. वीजेचे खाजगीकरण करण्याचा हा डाव असल्याचे आणि अदानीच्या दावणी वीजमंडळाला लावल्याचे आरोप विरोधकांनी केलेले आहेत. यावर राज्य विधीमंडळ अधिवेनात खंडाजंगी चर्चा झाली. यावर उत्तर देताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी स्मार्टमीटर विषयीचे सर्व गैरसमज खोडून काढले. स्मार्ट मीटरचा विषय हा नवीन नॅरेटिव्हचा विषय आहे. काही क्रोनोलॉजी सांगितली पाहिजे. केंद्रीय ऊर्जा मंत्र्यालयाने २०२० मध्ये सुधारीत आरडीएसएसची योजना लागू केली. त्यानुसार केंद्र आणि राज्य सरकारने आरडीएसएसचा वितरणाचा आराखडा तयार करायचा होता. २९ हजार कोटीचा महाराष्ट्राचा आरखडा होता. स्मार्ट मीटर हा त्याचाच एक हा भाग होता असल्याचेही देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

# धर्मवीर आनंद दिघे तरणतलावाचे तातडीने सर्व कामे करण्याचे आयुक्तांचे आदेश


कोलशेत येथील सुविधा भूखंडाची पाहणी करताना आयुक्त सौरभ राव, अतिरिक्त आयुक्त २ प्रशांत रोडे, उपायुक्त क्रीडा मीनल पालांडे, माजी नगरसेवक देवराम भोईर, संजय भोईर, उषा भोईर उपस्थित होते.

ठाणे – महापालिकेच्या माध्यमातून बाळकूम येथे बांधण्यात आलेल्या धर्मवीर आनंद दिघे तरणतलाव येथे आवश्यक असलेली सर्व स्थापत्य कामे ही १० ऑगस्ट २०२४ पर्यत पूर्ण करुन तरणतलाव १५ ऑगस्टपर्यत नागरिकांसाठी खुला करण्यात यावा असे निर्देश महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी संबंधित अधिकाऱ्यांना मंगळवारी झालेल्या पाहणीऱ्यादरम्यान दिले.


मंगळवारी (२ जुलै) आयुक्त सौरभ राव यांनी बाळकूम येथील धर्मवीर आनंद दिघे तरणतलाव, ढोकाळी येथील शरदचंद्रजी मिनी स्टेडियम व कोलशेत येथील सुविधा भूखंडाची पाहणी केली. यावेळी अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे, उपायुक्त क्रीडा मीनल पालांडे, माजी नगरसेवक देवराम भोईर, संजय भोईर, उषा भोईर आदी उपस्थित होते.

बाळकूम, कोलशेत आदी परिसरातील नागरिकांच्या सोयीसाठी धर्मवीर आनंद दिघे तरण तलाव महापालिकेच्या माध्यमातून बांधण्यात आला आहे. सदर तरणतलाव अद्याप नागरिकांसाठी खुला झाला नसल्याने तो लवकर खुला करावी अशी मागणी सातत्याने परिसरातील नागरिकांकडून होत आहे. या पार्श्वभूमीवर आयुक्तांनी या तरणतलावाची पाहणी करुन कामाचा आढावा घेत या ठिकाणी अपूर्ण अवस्थेत असलेली सर्व कामे लवकरात लवकर पूर्ण करावीत असे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. तळमजला अधिक चार मजल्याची ही इमारत असून इमारतीच्या लिफ्टचे काम हे सप्टेंबरपर्यत पूर्ण होईल असे संबंधित ठेकेदारांकडून सांगण्यात आले. परंतु तत्पूर्वी तरणतलावाची सर्व कामे पूर्ण करुन सदर तरणतलाव १५ ऑगस्ट रोजी नागरिकांसाठी खुला करावा असेही आयुक्तांनी नमूद केले. तसेच या ठिकाणी लहान मुलांसाठी बेबी पूलची मागणीही (पान २ वर)

अत्याचाराच्या गुन्ह्यातील आरोपीला बोगस जामीन ....रॅकेट असल्याचा संशय

# बनावट जामीन: न्यायालयाची दिशाभूल प्रकरणी पाच जणांना अटक

(छाया : मनोज सिंह)


बनावट कागदपत्रे तयार करून न्यायालयात बोगस जमीन देणाऱ्या टोळीचा ठाणे नगर पोलीस स्टेशनने पर्दाफाश केला आहे याबाबत सहाय्यक पोलीस आयुक्त प्रिया ढाकणे यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली यावेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयकुमार देशमुख,तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक दीपक खेडकर उपस्थित होते.

ठाणे – ठाण्याच्या अतिरिक्त जिल्हा न्यायालयात सुनावणी सुरु असलेल्या अत्याचाराच्या गुन्ह्यातील बंदिस्त आरोपी रमेश सत्यनारायण यादव याच्या सुटकेसाठी जमीनदाराचे बनावट दस्तावेज बनवून ठाणे न्यायालयात हजर करणाऱ्या पाच जणांच्या टोळीला ठाणेनगर पोलिसांनी बेड्या ठोकल्या. या बनावट जामीन रॅकेटमध्ये अन्य आरोपी असण्याची आणि पुणे, मुंबई, ठाणे जिल्ह्यातील न्यायालयात बनावट जामीनदार उभे करून आरोपींची सुटका केल्याची माहिती समोर आलेली आहे.

लैंगिक अत्याचार या गंभीर गुन्ह्यात न्यायालयीन बंदी असलेल्या आरोपी रमेश सत्यनारायण यादव याची जामिनावर सुटका कर्णयसाठी जमीनदार हुसेन वारसी अन्सारी याच्या नावाची बनावट (पान २ वर)

# ४८ तासात ठाण्यात अडीच लाखांच्या सोनसाखळ्या लांबविल्या

## ठाण्यात सोनसाखळी चोरटे पुन्हा सक्रिय

ठाणे (सुरेश साळवे) – ठाण्यात सोनसाखळी चोरटयांनी उच्छाद मांडलेला होता. ठाणे पोलिसांनी धडक कारवाई करून इराणी टोळी सारख्या टोळ्या गजाआड केल्याने आणि सोनसाखळी चोरटे कारागृहात गेल्याने सोनसाखळी चोरीच्या गुन्ह्यात घट झाली. त्यानंतर पुन्हा काही महिन्याने आता सोनसाखळी चोरटे पुन्हा हे सक्रिय झाल्याचे चित्र आहे. अवघ्या ४८ तासात सोनसाखळी चोरट्यानी दुचाकीवर येऊन तीन विविध घटनात अडीच लाखाचे सोने घेऊन धूम स्टाईलने फरार झाले. या तिन्ही घटनांची नोंद कासारवडवली, कापूरबावडी पोलीस ठाण्यांमध्ये करण्यात आलेली आहे.

ठाण्याच्या कासारवडवली पोलीस ठाण्याच्या हद्दीत वास्तव्य करणाऱ्या तक्रारदार सुरेखा लहू वळवी(५५) रा. वळवीपाडा, खुशी बारच्या पाठी मागे, नागलाबंदर घोडबंदर रोड, ठाणे या ओवळा येथे ब्ल्यू रूफ हॉटेलमध्ये साफसफाईचे काम करतात. घटनेच्या दिवशी काम संपल्यानंतर रात्री ९ वाजण्याच्या सुमारास त्तक्रारदार कासारवडवली सिग्नल जवळून जात असताना त्यांच्या जवळ आलेल्या दुचाकीवरील अज्ञात सोनसाखळी चोरट्याने त्यांच्या गळ्यातील ३५ हजाराची सोनसाखळी खेचून पोबारा केला. तर सोनसाखळी खेचण्याची घटना वाघबीळ परिसरात घडली. तक्रारदार सुशिल रामप्रसाद तोदी (४६) रा. कॉंसौस पार्क, (पान २ वर)

- सलग गुन्ह्यानंतर सोनसाखळी चोरटे होतात भूमिगत
- नवख्या सोनसाखळी चोरट्यांचा उच्छाद



ठाणे येथे शिक्षक मतदार संघासाठी झालेल्या निवडणुकीत शिक्षकांनी पैसे घेतले असा आरोप काँग्रेसचे अध्यक्ष ॲड. विक्रांत चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत केला आहे. (छाया–मनोज सिंह)

# वारकऱ्यांच्या वाहनांना टोल माफ २१ जुलैपर्यंत मिळणार टोलमाफी

मुंबई : अवघ्या महाराष्ट्राला पांडुरंगाचे वेड लागलं असून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून पंढरीच्यादिशेने टाळ–मृदुंगाचा गजर करत, मुखी हरीनाम जपत दिंड्या पंढरीकडे निघाल्या आहेत. ऊन, पाऊस, वाऱ्यासह निसर्गाच्या विविध संकटांचा सामना करत वारकरी पंढरीकडे पाऊलं टाकत आहेत. तर, एसटी महामंडळानेही हजारो बस पंढरीच्या वारीसाठी सोडल्या आहेत. याशिवाय खासगी वाहनांचीही मोठी संख्या पंढरपूरकडे ये–जा करत असते. वारीच्या कालावधीत पंढरीत लाखो वैष्णवांचा मेळा जमतो. कार, बससह विविध वाहनांतून वारकरी, भाविक भक्त मोठ्या संख्येने चंद्रभागेच्या तिरी जमतात. या भाविकांसाठी राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. गतवर्षीप्रमाणे यंदाही (पान २ वर)

## महामंडळाच्या बसेसनाही टोलमाफी

महाराष्ट्र राज्यातून पांढरपूरकडे येणारे सर्व पथकर नाक्यांवर उपरोक्त कालावधीत पथकर माफी नसलेल्या महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसनाही पथकरातून सूट देण्याच्या सूचना राज्य शासनाने दिल्या आहेत.

## २१ जुलैपर्यंत मिळणार टोलमाफी

पंढरपूरला आषाढी कार्तिकी निमित्त जाणाऱ्या व परत येणाऱ्या पालख्या आणि वाहनांना पथ करातून सूट देण्यात आली आहे. वारीत सहभागी असलेल्या वारकऱ्यांच्या वाहनांसाठी परिवहन विभागातून आवश्यक स्टीकर्स दिले जाणार आहेत. विशेष म्हणजे ३ जुलै ते २१ जुलै या कालावधीत पंढरपूरला जाणाऱ्या आणि पंढरपूरहून गावी जाणाऱ्या सर्वच वाहनांना ही सवलत असणार आहे. दरम्यान, गरज पडल्यास सुरक्षित व सुरळीत वाहतूकीसाठी वारीतील वाहने सोडून अवजड वाहनांना वारी मार्गावर बंदी घालण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत.

## १७ जुलै रोजी आषाढी

यावर्षी आषाढी एकादशी १७ जुलै रोजी होत असून यात्रेत यंदा प्रथमच अगदी भंडीशेगावपासून पंढरपूर शहरापर्यंत ठिकठिकाणी आकर्षक विद्युत रोषणाई केली जाणार आहे. यंदाची आषाढी एकादशी आजपर्यंतच्या आषाढीतील बेस्ट असेल असा विश्वास सोलापूर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी एबीपी माझाशी बोलताना व्यक्त केला. यावर्षी प्रथमच भंडीशेगाव, वाखरी या पालखी मार्गावरील इमारती, झाडांना आकर्षक विद्युत रोषणाई करून लाखो भाविकांचे स्वागत केले जाणार आहे. यानंतर पालखी सोहळे पंढरपुरात पोचल्यावर इसबावी, कॉलेज चौक, चंद्रभागा वाळवंट, भाविकांचे निवासस्थळ असणारे ६५ एकरावरील भक्तिसागर अशा विविध ठिकाणी हे आकर्षक विद्युत रोषणाई केली जाणार आहे. यासाठी विविध जागांची पाहणी केली असून पालखी सोहळे येण्यापूर्वी ही विद्युत रोषणाई पूर्ण केली जाणार आहे.

# संपादकीय...



संपादक–चंद्रकांत भोईटे

## विधानपरिषदेची प्रतिष्ठेची लढाई

राज्यातील विधानपरिषदेच्या ११ जागांसाठी दि.१२ जुलै रोजी होणाऱ्या निवडणुकीसाठी १२ उमेदवार रिंगणात असणार आहेत. महाविकास आघाडीकडून तीन उमेदवार दिल्याने आता ही निवडणूक होणे गरजेचे आहे. महाविकास आघाडी किंवा महायुती या दोन्हीसमोर मतांची जुळवाजुळव करून आपल्या उमेदवारांना निवडून आणण्याचे आव्हान दोहोंकडच्या वरिष्ठ नेत्यांसमोर असणार आहे. महाविकास आघाडीला आपला तिसरा उमेदवार निवडून आणण्यासाठी चार किंवा जास्त मतांची गरज भासणार आहे असे दिसते. तर महायुतीला आपला नववा उमेदवार निवडून आणण्यासाठी सहा मतांची गरज भासणार आहे. या मतांची जुळवाजवळ नेमकी कअशी होणार ? यात अपक्ष आमदारांचे महत्व किती ? कोण पडद्याआडून मतदान करणार, असे प्रश्न उपस्थित होत आहेत. त्यात नुकत्याच फुटलेल्या पक्षातील आमदार कुणाच्या बाजूने निर्णय घेणार, याचीही चर्चा सुरू झाली आहे. विधानपरिषदेची निवडणूक १२ जुलै म्हणजे काही दिवसांवर आली आहे. त्यादृष्टीने राज्यातील राजकीय घडामोडींना वेग आला आहे. विधानपरिषदेची निवडणूक बिनविरोध होईल अशी स्थिती होती. मात्र शेवटच्या दोन दिवसांमध्ये महाविकास आघाडीने तिसरा उमेदवार दिला आणि या निवडणुकीत महायुतीसमोर आव्हान निर्माण केले. त्यामुळे निवडणुकीतील रंगत वाढली आहे. महाविकास आघाडीतर्फे काँग्रेसच्या प्रज्ञा सातव, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून शेकापचे जयंत पाटील आणि अचानकरित्या शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार मिलिंद नार्वेकर यांची उमेदवारी दाखल झाली. त्यामुळे महाविकास आघाडीला तिसरा उमेदवार निवडून आणण्यासाठी मतांची जुळवाजुळव करावी लागणार आहे. महाविकास आघाडीसमोर आव्हान आहे तसेच महायुतीसमोर आव्हान उभे राहिले आहे. विधानपरिषदेच्या निवडणुकीसाठी २३ मतांचा कोटा आहे. विधानसभेत महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये कोणाची किती ताकद असेल आणि अकरावी जागा निवडून आणण्यासाठी मतांची जुळवाजुळव कशी करावी लागणार याची चाचपणी दोन्ही बाजूनी सुरू आहे. महाविकास आघाडीपेक्षा दुपाटीहून अधिक आमदारांचे संख्याबळ महायुतीकडे आहे, असे चित्र दिसते. परंतु निवडणुकीच्या मतदानावेळी नेमके कोण कुणाकडे जाणार, कुणाला मत देणार, त्यावेळची राजकीय गणिते नेमकीवकाय असणार यावर अकराव्या जागेचे भवितव्य अवलंबून आहे. महाविकास आघाडीमध्ये महत्वाचे राजकीय पक्ष काँग्रेस, राष्ट्रवादी शरद पवार गट आणि शिवसेना ठाकरे गट यांचा समावेश आहे. तसेच बहुजन विकास आघाडी, समाजवादी पक्ष, एमआयएम, मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी, शेतकरी कामगार पक्ष हे महाविकास आघाडीचे घटक पक्ष आहेत. यापैकी राष्ट्रवादी शरद पवार –१२, उद्धव ठाकरे शिवसेना – १५ + १ शंकरराव गडाख = १६, काँग्रेस – ३७ असे मिळून एकूण – ६५ तर बहुजन विकास आघाडी – ३, समाजवादी पक्ष – २, एमआयएम – २, मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी – १, शेतकरी कामगार पक्ष –१ असे एकूण ९ घटक पक्ष असे संख्याबळ आहे. महाविकास आघाडीला पाठिंबा देणारे पक्ष लक्षात घेऊन एकूण आमदार ७१ आमदार महाविकास आघाडीकडे आहेत. तरीही महाविकास आघाडीला मतांची जुळवाजुळव करण्यासाठी चार किंवा त्यापेक्षा अधिक मतांची गरज पडणार, असे दिसते. महायुतीमध्ये भाजपा, राष्ट्रवादी (अजित पवार गट ), शिवसेना (शिंदे गट) प्रामुख्याने हे तीन राजकीय पक्ष आहेत. यात राष्ट्रवादी (अजित पवार) – ४१, भाजपा – १०३, शिवसेना शिंदे गट – ३८ असे संख्याबळ आहे. तसेच महायुतीला देवेंद्र भुयार, संजयमामा शिंदे या राष्ट्रवादी (अजित पवार) गटाला मानणारे आमदार पाठींबा देण्याची शक्यता आहे. असे अजित पवार राष्ट्रवादीचे एकूण ४३ आमदार महायुतीला पाठींबा देतील. तसेच भाजपला रवी राणा, महेश बालदी, विनोद अग्रवाल,प्रकाश आवाडे, राजेंद्र राऊत, विनय कोरे, रत्नाकर गुट्टे हे आमदार पाठिंबा देणार आहेत, असा अंदाज आहे. भाजप व मित्र पक्ष आणि अपक्ष असे मिळून ११० आमदार आहेत. तसेच एकनाथ शिंदे शिवसेना गट – ३८, त्यांना नरेंद्र भोंडेकर, किशोर जोरगेवार, लता सोनवणे, बच्चू कडू, राजकुमार पटेल, गीता जैन, आशीष जैसवाल, मंजुळा गावीत, चंद्रकांत निंबा पाटील, राजू पाटील या १० आमदारांचा पाठिंबा आहे. महायुतीला अशा एकूण २१० आमदारांचा पाठींबा आहे. महायुतीला आपले नऊ उमेदवार निवडून आणण्यासाठी आणखी सहा मतांची गरज भासणार आहे. त्यामुळे अपक्ष आमदारांवर महायुतीची मदार अवलंबून असणार आहे. विधान परिषदेच्या जागा ११ तर १२ जण या निवडणुकीसाठी इच्छुक असल्याने एका उमेदवाराचा पराभव निश्चित आहे. पण हा उमेदवार महाविकास आघाडी की महायुतीचा हे निकालादिवशीच समजेल. तसेच सध्या दोन्हीकडून मोठी खलबते सुरू असून या निवडणुकीत कोण बाजी मारेल, हे राजकीय व्यूहरचनेवर अवलंबून आहे. आता या निवडणुकीतील विजयश्री खेचून आणण्याची मदार सर्वस्वी अपक्ष उमेदवारांवर अवलंबून आहे. या निवडणुकीत क्रॉस वोटिंगही महत्वाचे व निर्णयात्मक ठरणार आहे. विधानासपरिषदेच्या या निवडणुकीत घोडेबाजार होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. आघाडी आणि युतीसाठी ही प्रतिष्ठेची लढाई असणार आहे.

## ४८ तासात ठाण्यात अडीच लाखांच्या सोनसाखळ्या लांबविल्या

**(पान १ वरून)** आयब्रिस वन फ्लॅट नं. ३०२, कावेसर घोडबंदर रोड, २९ जून रोजी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास तक्रारदार हे वाघबीळ येथून ओमशांती चौकच्या दिशेला जात असताना मागून आलेल्या हेल्मेट आणि रेनकोट घातलेल्या दुचाकीवरील दोन इसम यांच्यापैकी मागे बसलेल्या इसमाने तक्रारदार यांच्या गळ्यातील ९५ हजाराची सोनसाखळी खेचून धूम स्टाईलने फरार झाले. या दोन्ही सोनसाखळी चोरीच्या घटनांमध्ये तक्रारदारांनी अज्ञात सोनसाखळी चोरट्याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

सोनसाखळी चोरीची तिसरी घटना ठाण्याच्या कापूरबावडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील लोढा कासा रॉयल सोसायटीच्या मेनगेटजवळ असलेल्या रिक्षा स्टँडजवळ घडली. तक्रारदार अनिता दिलीप सावंत(५४) रा. आत्माराम निवास को. औ. सोसा., घर क्र–६०४, ६ वा मजला, राज ज्वेलर्स समोर, बाळकुम पाडा नं.२, ठाणे यांची मुलगी कविता निलेश गायकवाड(३७) ही ठाण्याकडे जाण्यासाठी निघालेल्या असता मागून आलेल्या दुचाकीवरील चोरटयांनी त्यांच्या गळ्यातील १ लाख २० हजाराची सोनसाखळी जबरदस्तीने खेचून पोबारा केला.

■ **सलग गुन्ह्यानंतर सोनसाखळी चोरटे होतात भूमिगत –** ठाण्यात इराणी टोळीच्या मुसक्या पोलिसांनी आवळल्यानंतर अनेक महिने सोनसाखळी गुन्ह्यांना चांगलाच आळा बसला होता. मात्र पोलिसांची कारवाई थंडावली कि काही महिन्यानंतर पुन्हा सोनसाखळी चोरटे सक्रिय झाले. ठाण्याच्या चरई परिसरात वृद्धेच्या गळ्यातील सोनसाखळी जबरदस्तीने खेचल्याने वृद्ध जखमी झाल्याच्या घटनेनंतर पुन्हा सोनसाखळी चोरटयांनी उच्छाद मांडला. ठाणे पोलिसांनी पुन्हा धडक कारवाई केल्यानंतर सोनसाखळी चोरटे हे पुन्हा भूमिगत झालेले होते. आता पुन्हा अनेक महिन्यानंतर कासारवडवली आणि कापूरबावडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत सोनसाखळी चोरटे पुन्हा सक्रिय जाळायचे दिसत आहे. एकाच दिवशी सलग तीन सोनसाखळीच्या घटना घडल्या यामध्ये काही अंतरात या घटना घडल्याचे चित्र आहे. २९ जून नंतर ठाण्यात पुन्हा सोनसाखळी खेचण्याचा गुन्हा दाखल झालेला नाही.

■ **नवख्या सोनसाखळी चोरट्यांचा उच्छाद –** सोनसाखळी चोरणाऱ्या किंवा खेचणाऱ्या इराणी टोळी व्यतिरिक्त अनेक छोट्या टोळ्या या कार्यरत आहेत. मात्र इराणी टोळी आणि अन्य टोळीचे गुन्हेगार पोलिसांच्या रेकॉर्डवर आल्याने टोळीतील अन्य गुन्हेगार हे भूमिगत होतात. आरोपी सापडल्याने अनेक गुन्ह्याची उकल झाल्याने पोलीस कारवाई थंडावली कि, नवखे पोलीस रेकॉर्डवर नसलेले सोनसाखळी चोरटे हे सलग तीन चार सोनसाखळी खेचून पोबारा करतात. त्यानंतर अनेक महिने त्या परिसराकडे जाताच नाहीत. बराच कालावधी उलटल्यानंतर हे नवखे पुन्हा एकेदिवशी सलग घटना घडवून भूमिगत होतानाचे कार्यपद्धती पाहायला मिळत आहे. चोरटे हे सीसीटीव्ही नसलेल्या किंवा सीसीटीव्हीत कैद होणार नाही याची दक्षता बाळगत असल्याचेही समोर येत आहे. त्यामुळे पोलिसांच्या तावडीत हे सोनसाखळी चोरटे सापडत नाहीत.

## लाडकी बहीण योजनेत एका कुटुंबातील किती महिलांना लाभ मिळणार?

**(पान १ वरून)** निर्णय म्हणजे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना हा होय. या निर्णयाच्या अंमलबजावणीलाही सुरुवात झाली आहे. त्याच पार्श्वभूमीवर शासनाने ही योजना आणखी सुलभ करण्यासाठी योजनेच्या निकषांमध्ये महत्त्वाचे बदल केले आहेत. त्यानुसार, आता २१ ते ६५ वर्षांपर्यंतच्या सर्वच महिलांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. तर, एका कुटुंबातील २ महिलांना याचा लाभ मिळेल, अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली. जुलै महिन्यापासून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना लागू करण्यात आली आहे. सरकारने या योजनेत काही महत्त्वाचे बदल केले आहेत. त्यानुसार, एका कुटुंबातील दोन महिलांना ह्या योजनेचा लाभ देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. त्यानुसार, एक विवाहित आणि एक अविवाहित महिला भगिनींना देखील योजनेचा लाभ मिळू शकणार आहे. आम्ही कुटुंब नियोजन करुन चूक केली का, असा जो सवाल येतो त्याच प्रश्नाचं उत्तरही यातून दिलंय, असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले. तसेच, १ जुलैपासून पुढील ६० दिवसांत जे अर्ज करतील, त्यांना १ जुलैपासूनचे पैसे मिळतील आणि १ ऑगस्टनंतर जे अर्ज करतील, त्यांना अर्ज केल्यानंतरच्या महिन्यापासून पैसे मिळतील, अशी माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषद सभागृहात माहिती देताना दिली.

**एजंटच्या नादी लागू नये –** कोणीही एजंटच्या नादी लागू नका, कोणी एजंट येत असेल तर तक्रार करा. अमरावतीमध्ये एका सरकारी कर्मचाऱ्याने गडबड करण्याचा प्रयत्न केला, त्याला निलंबित करण्यात आलं आहे, त्यास बडतर्फ करण्याचाही विचार सरकार करत आहे.

## नवीन ठाणे रेल्वे स्थानकाच्या कामाला मिळणार गती

**(पान १ वरून)** त्याचबरोबर परिचलन क्षेत्राच्या बाहेर ठाणे स्मार्ट सिटीतंर्गत करण्यात येणाऱ्या कामासाठी मेट्रो प्रकल्पाचे काम सोडून उर्वरित कामासाठी रेल्वेच्या ना हरकत घेण्याची तरतूदही रद्द करण्यात यावी, ही खासदारांची मागणी मंत्री वैष्णव यांनी मान्य केली.

ठाणे आणि मुलुंड रेल्वे स्थानकातील गर्दीचा भार कमी करण्यासाठी नवीन रेल्वे स्थानकाची उभारणी करण्यात येत आहे. या स्थानकाबाहेरील प्रवासी सुविधेसाठी आवश्यक असलेल्या सोयीसुविधांची उभारणी करण्याची कामे करण्यात येत आहेत. यात रस्ते, पुलाच्या उभारणीच्या कामांचा समावेश आहे. तसेच रेल्वे स्थानक उभारणीचे काम रेल्वे विभागामार्फत करण्यात येणार होते. या कामासाठी पालिका प्रशासन रेल्वे विभागाला पैसे देणार होती. परंतु रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी घेतलेल्या निर्णयामुळे ठाणे महापालिकेचे अंदाजे १८५ कोटी रुपये वाचणार आहेत. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी हे उपस्थित होते.

चौकट ठाणे येथे मनोरूग्णालयाच्या जागेत ठाणे स्मार्ट सिटीतंर्गत नवीन रेल्वे स्टेशन बांधण्यात येत आहे. यामध्ये रेल्वे परिचलन क्षेत्रामधील ट्रॅक बांधणे, रेल्वे स्टेशन इमारत बांधकाम बांधणे आदी अनुषंगिक कामे आणि परिचलन क्षेत्राच्या बाहेरील डेक, रॅम्प आदी अनषंगिक कामे स्मार्ट सिटीच्यावतीने करण्यात येणार आहेत. या कामांसाठी आता पालिका ऐवजी रेल्वे विभाग निधी खर्च करणार आहे.

## वारकऱ्यांच्या वाहनांना टोल माफ २१ जुलैपर्यंत मिळणार टोलमाफी

**(पान १ वरून)** आषाढी वारीसाठी येणाऱ्या–जाणाऱ्या भाविकांना टोलमाफी देण्यात आली आहे. आजपासून २१ जुलैपर्यंत ही टोलमाफी असणार आहे.

कोकणातील गणेशोत्सवाप्रमाणे पंढरपूर येथे आषाढीच्या वारीसाठी जाणाऱ्या वारकऱ्यांच्या वाहनांना टोल माफ करण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गतवर्षी जाहीर केला होता. कोरोनामुळे दोन वर्षे खंड पडल्यामुळे गतवर्षी वारकऱ्यांच्या संख्येत मोठी वाढ झाल्याचं दिसून आलं, त्याचा विचार करून सरकारने गतवर्षी वारीसाठी येणाऱ्या–जाणाऱ्या वाहनांना टोलमाफी केली होती. आता, यंदाही राज्य सरकारने टोलमाफीचा निर्णय घेतला असून आजपासूनच पंढरपूरकडे जाणाऱ्या वाहनांना टोलमाफीचा लाभ मिळणार आहे.

## धर्मवीर आनंद दिघे तरणतलावाचे तातडीने सर्व कामे करण्याचे आयुक्तांचे आदेश

**(पान १ वरून)** नागरिकांकडून होत असल्याचे माजी नगरसेवक संजय भोईर यांनी आयुक्तांच्या निदर्शनास आणून दिले. याबाबत आवश्यक बदल करुन मार्ग काढण्यात येईल असेही आयुक्त सौरभ राव यांनी नमूद केले.ढोकाळी येथील शरदचंद्रजी मिनी स्टेडियमची पाहणी ही आयुक्तांनी केली. या स्टेडियमध्ये असलेल्या बॅडमिंटन कोर्टच्या छताचे वॉटरप्रुफींगचे काम तातडीने करण्यात यावे., तसेच इमारतीला लावण्यात आलेल्या टाईल्स या उखडलेल्या अवस्थेत असून त्याची दुरुस्ती करावी, तसेच ज्या ठिकाणी गळती होते त्या ठिकाणची दुरूस्ती करण्याच्या सूचनाही आयुक्त श्री. राव यांनी यावेळी दिल्या. यावेळी उपहार गृह, प्रशासकीय कार्यालय आदींची देखील पाहणी करण्यात आली.

घोडबंदर परिसरातील कलरकेम येथे महापालिकेस उपलब्ध झालेल्या सुविधा भूखंडाची पाहणीही यावेळी करण्यात आली. घोडबंदर परिसरात नागरिकांसाठी खेळाचे मैदान उपलब्ध नसून याबाबत नागरिक वारंवार मागणी करत असल्याचे माजी नगरसेविका उषा भोईर यांनी नमूद केले. सदर सुविधा भूखंडावर क्रिकेटचे मैदान तयार केल्यास याचा फायदा परिसरातील मुलांना निश्चितच होईल. याबाबत शासनस्तरावर पाठपुरावा करुन निर्णय घेवू असे आयुक्तांनी नमूद केले. तसेच बाळकूम येथे असलेल्या कलाभवनची पाहणी आपण केली असून कलाभवन दुरूस्ती करुन ते लवकरच कलाप्रेमींसाठी खुले होईल या दृष्टीने कार्यवाही करणार असल्याचेही आयुक्त सौरभ राव यांनी नमूद केले.

## बनावट जामीन: न्यायालयाची दिशाभूल प्रकरणी पाच जणांना अटक

**(पान १ वरून)** आधारकार्ड, इंटर नेशनल कंपनीत कमला असलयाचे ओळखपत्र, त्याची पेमेंट स्लिप, रेशनकार्ड तयार करून वारसी याला जामिनासाठी न्यायालयात उभे करण्यात आले. सादर दस्तावेजाची पडताळणी केल्यानंतर जमीनदार याचे कागदपत्र बनावट असल्याचे समोर आल्यानंतर जिल्हा सत्र न्यायालय, न्यायदान विभाग अधीक्षक विनोद यांनी ठाणे नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. पोलिसांनी दाखल गुन्ह्याचा तपासात बोगस जामीनदार हुसेन वर्षी अन्सारी(४६) रा. साई कृपा अपार्टमेंट अमृतनगर मुंब्रा याला १२ जून, २०२४ रोजी अटक केली. त्याच्या अधिक चौकशीत आरोपी अस्लम नूर महंमद मन्सुरी(५८) रा. स्मॉल काझी स्ट्रीट, नळबाजार, मुंबई याने झाप झेरॉक्स अँड कम्युनिकेशन अमृत नगर मुंब्रा, आरोपी मेहताब हैदर नसीम नक्वी(४१) व त्याचा मेहुणा मेहंदी हसन इकबाल हसन उर्फ आसिफ याचे झेरॉक्स दुकान शिवली नगर येथील मोईन अपार्टमेंट कौसा, मुंब्रा यांच्या सहकार्याने जामीनदार हुसेन वारसी याचे बनावट दस्त आधारकार्ड, राशन कार्ड, ओळखपत्र, आवश्यक दस्त तयार करण्यात आल्याचे समोर आले. त्यानंतर जामीनदाराला न्यायालयासमोर नेणारा इम्तियाज अहमद मेमन उर्फ चापट(४९) रा. सजाद चाळ , शिमला बेकारी जवळ, पहिली राबोडी अशा पाच जणांच्या टोळीला पोलिसांनी अटक केली. या टोळीने यापूर्वी अनेक जिल्ह्यातील न्यायालयात बनावट जामीनदार पुरविल्याचे समोर आलेले आहे. पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## ठाणे महानगरपालिका, ठाणे

कार्मिक विभाग

जाहिर नोटीस

ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील श्री. दिनेश दत्ताराम चाळके, बिगारी हे दि.०९/०२/२०१७ ते आजतागायत विनापरवाना गैरहजर असल्याचे निदर्शनास आले आहे.श्री. दिनेश दत्ताराम चाळके, बिगारी हे कार्यालयास कोणतीही पूर्वसूचना न देता दि.०९/०२/२०१७ पासून आजतागायत विना परवाना गैरहजर राहिले आहेत. गैरहजेरीच्या काळात श्री. दिनेश दत्ताराम चाळके, बिगारी यांनी कार्यालयाशी कुठल्याही प्रकारचा संपर्क साधलेला नाही. श्री. दिनेश दत्ताराम चाळके, बिगारी यांचा गैरहजर कालावधी विचारात घेता त्यांना महापालिकेच्या नोकरीची आवश्यकता नसल्याचे दिसून येते. श्री. दिनेश दत्तराम चाळके, बिगारी यांचा ५ वर्षापेक्षा जास्त विनापरवाना गैरहजेरी कालावधी विचारात घेता महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ चे नियम १३ (दोन) ची तरतूदीअन्वये त्यांचेविरुद्ध विभागीय चौकशी न करता त्यांना सेवेतून कमी का करण्यात येऊ नये याबाबत सदर जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या कार्यालयाकडे खुलासा सादर करावा. विहित मुदतीत खुलासा प्राप्त न झाल्यास, श्री. दिनेश दत्ताराम चाळके, बिगारी यांना काहीही सांगावयाचे नाही व ठाणे महानगरपालिकेच्या सेवेत स्वारस्य नाही असे गृहीत धरुन, त्यांना ठाणे महानगरपालिकेच्या सेवेतून कमी करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

मा. आयुक्त सो. यांचे मान्यतेने

ठामपा/पिआरओ/ कार्मिक/१००/२०२४-२५ — सही/-

दि:०३.०७.२०२४ — उपआयुक्त (मुख्यालय)

**Pls visit our oficial web-site www.thanecity.gov.in** — ठाणे महानगरपालिका,ठाणे

### जाहीर नोटीस
### तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय कल्याण

जा.क्र. फौजदारी/ जन्म मृत्यु नोंद /टे-६/ एस.आर क्र- २७३/२०२४ दि. १८/०६/२०२४

१ प्रति,
१) पांडुरंग महादेव पाटील, — अर्जदार
राहणार नागाव पो. दहीसर वरचापाडा ठाणे,
विरुध्द
२) निबंधक, जन्म मृत्यु नोंदणी विभाग, कल्याण डोंबिवली महानगर पालीका, कल्याण

तमाम जनतेस सदर नोटीसीद्वारे सुचीत करण्यात येते आहे ते येणेप्रमाणे:

१. उपरोक्त अर्जदार मितांश पांडुरंग पाटील, यांचा जन्म दिनांक २२/०१/२०२२ रोजी त्यांचे राहते घरी नागाव पो. दहीसर वरचापाडा ठाणे येथे झालेला आहे. अर्जदाराकडुन काही अपरिहार्य कारणामुळे तसेच अनावधनामुळे सदर जन्मची **नोंद निबंधक, जन्म मृत्यु नोंदणी विभाग, कल्याण डोंबिवली महानगर पालिका, कल्याण** दफ्तरी करुन जन्मचा दाखला प्राप्त करुन घ्यावयाचा राहीला होता. अर्जदार यांना त्यांच्या काही वैयक्तीक कारणांसाठी **स्वतः च्या** जन्म दाखल्याची आवश्यकता आहे.
२. उशीरा जन्मची नोंदणी दाखला मिळणेसाठी मा. तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचेकडुन आदेश प्राप्त करुन घ्यावयाचा असल्यामुळे सदर कार्यालयास अर्ज दि ०२/०४/२०२४ दाखल केला आहे.
३. सदर बाबत कोणत्याही व्यक्तीची कोणतीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सदर न्यायालयात दाखल करावी वरील मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखल केल्यास अर्जदार यांना सदर कार्यालयातर्फे त्यांच्या जन्म नोंदणीचा दाखला मिळणेकरीता आदेश करण्यात येईल.

आज दिनांक माहे १८/६/२०२४ रोजी माझे सहीने व शिक्क्याने दिली.

तहसील कार्यालयाचा सही शिक्का — हुकुमावरुन कार्यकारी दंडाधिकारी, कल्याण

### जाहीर नोटीस
### तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय कल्याण

जा.क्र. फौजदारी/ जन्म मृत्यु नोंद /टे-६/ एस.आर क्र- २५८/२०२४ दि. १८/०६/२०२४

१ प्रति,
१) नितीन बामा पाटील, — अर्जदार
राहणार नागाव पो. दहीसर वरचापाडा ठाणे,
विरुध्द
२) निबंधक, जन्म मृत्यु नोंदणी विभाग, कल्याण डोंबिवली महानगर पालीका, कल्याण

तमाम जनतेस सदर नोटीसीद्वारे सुचीत करण्यात येते आहे ते येणेप्रमाणे:

१. उपरोक्त अर्जदार नियश नितीन पाटील, यांचा जन्म दिनांक १९/०४/२०२२ रोजी त्यांचे राहते घरी नागाव पो. दहीसर वरचापाडा ठाणे येथे झालेला आहे. अर्जदाराकडुन काही अपरिहार्य कारणामुळे तसेच अनावधनामुळे सदर जन्मची **नोंद निबंधक, जन्म मृत्यु नोंदणी विभाग, कल्याण डोंबिवली महानगर पालिका, कल्याण** दफ्तरी करुन जन्मचा दाखला प्राप्त करुन घ्यावयाचा राहीला होता. अर्जदार यांना त्यांच्या काही वैयक्तीक कारणांसाठी **स्वतः च्या** जन्म दाखल्याची आवश्यकता आहे.
२. उशीरा जन्मची नोंदणी दाखला मिळणेसाठी मा. तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचेकडुन आदेश प्राप्त करुन घ्यावयाचा असल्यामुळे सदर कार्यालयास अर्ज दि ०१/०४/२०२४ दाखल केला आहे.
३. सदर बाबत कोणत्याही व्यक्तीची कोणतीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सदर न्यायालयात दाखल करावी वरील मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखल केल्यास अर्जदार यांना सदर कार्यालयातर्फे त्यांच्या जन्म नोंदणीचा दाखला मिळणेकरीता आदेश करण्यात येईल.

आज दिनांक माहे १८/६/२०२४ रोजी माझे सहीने व शिक्क्याने दिली.

तहसील कार्यालयाचा सही शिक्का — हुकुमावरुन कार्यकारी दंडाधिकारी, कल्याण

## मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण योजनेसाठी अडवणूक, दिरंगाई, पैशांची मागणी केल्यास कठोर कारवाई – मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचना

मुंबई – मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण योजनेसाठी आवश्यक प्रमाणपत्रे देणे, फॉर्म भरुन घेणे यासह या संपूर्ण प्रक्रियेत महिलांची अडवणूक केल्यास, प्रक्रियेत दिरंगाई केल्यास किंवा योजनेच्या लाभासाठी महिलांकडून पैशांची मागणी करीत असल्याचे निदर्सनास आल्यास अशा अधिकारी, कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशा सक्त सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या आहेत. त्याचबरोबर ही संपूर्ण प्रक्रिया पारदर्शकपणे आणि जलदगतीने होईल यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष ठेवावे, या योजनेचे संनियंत्रण करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी, असे निर्देशही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दिले आहेत.

त्याचबरोबर योजनेसंदर्भातील कागदपत्रे उपलब्ध करुन देणे किंवा फॉर्म भरुन देण्याचे निमित्त करुन निर्माण होणारे दलाल अजिबात खपवून घेतले जाणार नाहीत. एखाद्या कार्यालयात असा प्रकार निर्दशनास आल्यास संबंधित कार्यालय प्रमुखावर तसेच दलालांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे.

योजनेसाठी नावनोंदणी, अर्ज करणे आदी कामांसाठी होणारी गर्दी लक्षात घेऊन अर्ज करण्याची मुदत ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत वाढविण्यात आली आहे. योजनेच्या लाभासाठी पात्र महिलांना आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करुन देणे तसेच त्यानंतर योजनेचा फॉर्म भरणे इत्यादी संपूर्ण प्रक्रियेसंदर्भात काल विधानभवन येथे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सविस्तर चर्चा करुन योजनेची अंमलबजावणी पारदर्शक आणि जलदगतीने होईल यासाठी सूचना देण्यात आल्या आहेत.

माता–भगिनींचे आयुष्य बदलवून टाकणाऱ्या विविध योजना राज्य शासनाने आणल्या आहेत. मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण योजनेचा शासन निर्णयही लगेचच काढण्यात आला. या योजनेतील पात्र महिलांना महिन्याला दीड हजार रुपये म्हणजे वर्षाला १८ हजार रुपये राज्य सरकार देणार आहे. यासाठी ४६ हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. ही योजना म्हणजे माता–भगिनींना माहेरचा आहेर आहे. नोंदणीसाठी रांगा लावण्याची गरज पडणार नाही, यादृष्टीने चोख नियोजन करावे, लाडक्या बहिणींची कोणत्याही कारणास्तव अडवणूक होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी, अशा सक्त सूचना मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

## मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.) ता. जि. ठाणे – ४०१ १०१,
Fax No. - 28199093 E-mail rchmbmc@rediffmail.com.rchmbmc@yahoo.com.

**// जाहिर फेरनिविदा सुचना //**

मिरा–भाईंदर महानगरपालिकेच्या भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालयातील तळमजल्यावर नव्याने सुरु होणाऱ्या डायलिसीस विभागाकरीता आर.ओ. प्लांट तयार करणेकरीता इच्छुकांकडून दोन लिफाफा पध्दतीने फेरनिविदा मागविण्यात येत आहेत.

इच्छुकांनी खाली नमुद केल्यानुसार दर ई- टेंडरींग पध्दतीने मागविण्यात येत आहेत सदर कामाचे कोरे निविदा फॉर्म दि. ०४.०७.२०२४ ते दि. १०.०७.२०२४ रोजी दुपारी ०१.०० वाजेपर्यंत महानगरपालिकेच्या ई – टेंडरींग संकेत स्थळ https://mahatenders.gov.in येथे उपलब्ध होतील.

सदर कामी मागविलेल्या मोहरबंद निविदा दि. ११.०७.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत वरील संकेत स्थळावर स्विकारण्यात येतील व दि. १२.०७.२०२४ रोजी दुपारी ०४.०० वाजता उघडण्यात येतील. कोणत्याही प्रकारची ऑनलाईन निविदा स्विकारणे व नाकारणे याबाबतचा अंतिम अधिकार मा. आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे.

सदर कामाचा संक्षिप्त तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | निविदेचा तपशिल | अंदाजित खर्च | निविदा अनामत रक्कम | निविदा अर्ज किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | डायलिसीस विभागाकरीता आर.ओ. प्लांट, आर. ओ. स्टोरेज टँक, पाईपलाईन, वॉशिंग एरिया, बायकार्बोनेट मिक्सर व डायलिसीस संदर्भात इतर कामे करणे | २०००००० | २०००० | RS. २०००/-+ (GST१८%) =२३६०/- |

जा.क्र. मनपा/ मावज) E-२२५८२३५/२०२४-२५
दि. ०३/०७/२०२४

सही/-
(डॉ. बी. टी. दुधभाते)
वैद्यकीय आरोग्य अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

Public Trusts Registration Office, Thane
Address: 1st Floor,Lilly Apt, Parsi Agari Lane
Tembi Naka Thane (w)- 400601

## Public Notice

Service Request Number : THN/01609/18/24
Inquiry/case No. : ACC/III/285/2024
Name of the Trust : कामिनी चॅरिटेबल ट्रस्ट
**Address of the Trust : फ्लॅट नं. ००१, दिनकर प्लाजा, अडीवली, कल्याण, ठाणे, कल्याण, कल्याण**
**Name of the Applicant : सौ. कामिनी सुजीतकुमार मिश्रा**

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Thane.

1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash In Hand | 1000.00 |

**Value of Movable Property :** Rs. 1000/- Only
(In Words Rs. One Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only
(In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 20/06/2024.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office,
Thane

दैनिक महाराष्ट्र सम्राट
सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच !
संपादक : गणेश चंद्रकांत भोईटे



## राष्ट्रीय गृहनिर्माण बँक

- जागा : ४८
- पदाचे नाव तपशील:

१ जनरल मॅनेजर
२ असिस्टंट जनरल मॅनेजर
३ डेप्युटी मॅनेजर
४ असिस्टंट मॅनेजर
५ चीफ इकोनॉमिस्ट
६ सिनियर प्रोजेक्ट फायनान्स ऑफिसर
७ प्रोजेक्ट फायनान्स ऑफिसर
८ प्रोटोकॉल ऑफिसर
९ प्लिकेशन डेवलपर

- शैक्षणिक पात्रता:

पद क्र.१: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) ICWAI/ICAI/CFA/MBA (Finance) (iii) १५ वर्षे अनुभव
पद क्र.२: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) ICWAI/ICAI/CFA/MBA (Finance) (iii) १० वर्षे अनुभव
पद क्र.३: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) ICWAI/ICAI/CFA/MBA (Finance) (iii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.४: ६०% गुणांसह कोणत्याही शाखेतील पदवी SC/ST/PWD: ५५% गुण
पद क्र.५: (i) आर्थिक अर्थशास्त्र किंवा अर्थमिति या विषयातील विशेषीकरणासह अर्थशास्त्रात पदव्युत्तर पदवी. (iii) १५ वर्षे अनुभव
पद क्र.६: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) ICWAI/ICAI/CFA/MBA (Finance) (iii) १५ वर्षे अनुभव
पद क्र.७: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) ICWAI/ICAI/CFA/MBA (Finance) (iii) १० वर्षे अनुभव
पद क्र.८: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) उमेदवार हा भारतातील RBI/PSB/FI मधून निवृत्त अधिकारी असावा आणि वरिष्ठ व्यवस्थापन स्तरावर काम केले पाहिजे. भारतातील RBI/PSB/FIs मध्ये किमान २५ वर्षांचा अनुभव ज्यापैकी किमान ०५ वर्षांचा कामाचा अनुभव पब्लिक रिलेशन/प्रोटोकॉल ड्युटी क्षेत्रात असावा.
पद क्र.९: (i) B.E.(CS/IT)/B.Tech. (CS/IT)/MCA/M.Tech (CS/IT)/B.Sc.(CS/IT)/ M.Sc. (CS/IT) (iii) ०२ वर्षे अनुभव

- वयाची अट: ०१ जुलै २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट

पद क्र.१: ६२ वर्षांपर्यंत
पद क्र.२: ४० ते ५५ वर्षे
पद क्र.३: ३२ ते ५० वर्षे
पद क्र.४: २३ ते ३२ वर्षे
पद क्र.५: २१ ते ३० वर्षे
पद क्र.६: ४० ते ५९ वर्षे
पद क्र.७: ३५ ते ५९ वर्षे
पद क्र.८: ५० ते ६२ वर्षे
पद क्र.९: २३ ते ३२ वर्षे

- नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
- Fee: General/OBC/EWS: 850/- SC/ST/PWD: 175/-
- महत्त्वाच्या तारखा:

Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: १९ जुलै २०२४
परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.

- अधिकृत वेबसाईट https://www.nhb.org.in/

## भंडारा ऑर्डनन्स फॅक्टरी

- जागा : १५८
- पदाचे नाव तपशील:

१ कार्यकाळ आधारित DBW (डेंजर बिल्डिंग वर्कर) १५८

- शैक्षणिक पात्रता: AOCP ट्रेड (NCTVT) चे माजी प्रशिक्षणार्थी ज्यांना ऑर्डनन्स फॅक्टरी प्रशिक्षण / लष्करी दारूगोळा आणि स्फोटकांच्या निर्मिती आणि हाताळणीचा अनुभव आहे. आणि पूर्वीच्या आयुध निर्माणी मंडळाच्या आयुध कारखान्यांमध्ये प्रशिक्षण घेतलेले AOCP ट्रेडचे एक्स-ट्रेड अप्रेंटिस. किंवा NCTVT (आता NCVT) द्वारे जारी केलेले NAC/NTC प्रमाणपत्र असलेले उमेदवार आणि सरकारशी संलग्न असलेल्या सरकारी/खाजगी संस्थेकडून AOCP ट्रेडमध्ये आणि सरकारी ITI मधून AOCP असलेले उमेदवार विचारात घेतले जातील.
- वयाची अट: १५ जुलै २०२४ रोजी १८ ते ३५ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
- नोकरी ठिकाण: भंडारा
- फी : फी नाही.
- अर्ज पाठविण्याचा पत्ता: The Chief General Manager, Ordnance Factory Bhandara District: Bhandara Maharashtra, Pin-441906
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: १५ जुलै २०२४
- अधिकृत वेबसाइट https://ddpdoo.gov.in/units/OFBA

## स्टाफ सिलेक्शन कमिशन

- Total: १७७२७ जागा
- परीक्षेचे नाव: SSC संयुक्त पदवीधर स्तर परीक्षा २०२४
- पदाचे नाव तपशील:

१ असिस्टंट सेक्शन ऑफिसर
२ असिस्टंट/असिस्टंट सेक्शन ऑफिसर
३ इस्पेक्टर ऑफ इनकम टॅक्स
४ इन्स्पेक्टर
५ असिस्टंट एनफोर्समेंट ऑफिसर
६ सब इंस्पेक्टर
७ एक्झिक्युटिव असिस्टंट
८ रिसर्च असिस्टंट
९ डिविजनल अकाउंटेंट
१० सब इंस्पेक्टर (CBI)
११ सब इंस्पेक्टर/जुनियर इंटेलिजन्स ऑफिसर
१२ कनिष्ठ सांख्यिकी अधिकारी
१३ ऑडिटर
१४ अकाउंटेंट
१५ अकाउंटेंट /ज्युनियर अकाउंटेंट
१६ पोस्टल असिस्टंट / सॉर्टिंग असिस्टंट
१७ वरिष्ठ सचिवालय सहाय्यक / उच्च श्रेणी लिपिक
१८ सिनियर एडमिन असिस्टंट
१९ कर सहाय्यक
२० सब-इस्पेक्टर (NIA)

- शैक्षणिक पात्रता:

कनिष्ठ सांख्यिकी अधिकारी: पदवी व १२वीत गणितामध्ये किमान ६०% गुण किंवा सांख्यिकीसह कोणत्याही विषयात पदवी.

- उर्वरित पदे: कोणत्याही शाखेतील पदवी.
- वयाची अट: ०१ ऑगस्ट २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट

पद क्र.१: २० ते ३० वर्षे, १८ ते ३० वर्षे
पद क्र.२, ३, ४, ५, ६, ७, ८, ९, ११: १८ ते ३० वर्षे
पद क्र.१०: २० ते ३० वर्षे
पद क्र.१२: १८ ते ३२ वर्षे
पद क्र.१३ ते २०: १८ ते २७ वर्षे

- नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
- Fee: General/OBC: 100/- SC/ST/PWD
- महत्त्वाच्या तारखा:

Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: २४ जुलै २०२४ (११:०० PM²)
Tier I परीक्षा: सप्टेंबर/ऑक्टोबर २०२४
Tier II परीक्षा: डिसेंबर २०२४

- अधिकृत वेबसाईट https://ssc.gov.in/

## हिंदुस्तान कॉपर लिमिटेड

- Total: ५६
- पदाचे नाव तपशील:

ज्युनियर मॅनेजर माइनिंग
इलेक्ट्रिकल
कंपनी सेक्रेटरी
फायनान्स
HR

- शैक्षणिक पात्रता: माइनिंग/इलेक्ट्रिकल डिप्लोमा + ०५ वर्षे अनुभव किंवा माइनिंग/इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग पदवी+ ०२ वर्षे अनुभव किंवा पदवीधर+ ०५ वर्षे अनुभव/CA किंवा PG पदवी/ डिप्लोमा(Finance/HR) PG MBA (Finance/HR) + ०२ वर्षे अनुभव
- वयाची अट: ०१ जून २०२४ रोजी १८ ते ४० वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
- नोकरी ठिकाण: कोलकाता
- Fee: General/OBC/EWS: ५००/- SC/ST: फी नाही
- महत्त्वाच्या तारखा:

Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: २१ जुलै २०२४

- वेबसाईट https://www.hindustancopper.com/

# ‘सफाई अपनाओ, बिमारी भगाओ’अभियानांतर्गत चारही प्रभागामध्ये विशेष स्वच्छता अभियान

पनवेल - आयुक्त श्री.मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात १ जुलै ते ३१ ऑगस्ट दरम्यान स्वच्छ भारत मिशन अर्बन २.० अंतर्गत ‘सफाई अपनाओ, बिमारी भगाओ’ अभियान राबविण्यात येत आहे. गेल्या दोन दिवसांमध्ये चारही प्रभाग समितीमध्ये विशेष स्वच्छता मोहिमांचे आयोजन करण्यात आले. या मोहिमांमध्ये महापालिकेच्या स्वच्छता दूतांबरोबरच नागरिकांनी देखील मोठा सहभाग नोंदविला.

केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार ‘सफाई आपनाओ, बिमारी भगाओ’ अभियानांतर्गत पहिल्या आठवड्यामध्ये विशेष स्वच्छता मोहिम आयोजित करण्याविषयी सूचित करण्यात आले होते. त्यानूसार उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या सूचनेनूसार प्रभाग समिती ब अंतर्गत रोडपाली येथे जय महाराष्ट्र रिक्षा नाका व बस स्टॉप येथे विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यामध्ये प्रभाग क्रमांक ७ चे स्वच्छता दुत जय महाराष्ट्र रिक्षा नाकाचे सर्व रिक्षावाले तसेच ज्येष्ठ नागरिकांनी सहभाग नोंदविला.

याबरोबर प्रभाग समिती ड पनवेल विभागामध्ये पनवेल बस स्थानक येथे सफाई अपनाओ बिमारी भगाओ स्वच्छता अभियानांतर्गत स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यावेळी बस स्थानकांचे अधिकारी व कर्मचारी यांनी स्वच्छता मोहिमेमध्ये सहभाग नोंदविला. तसेच पनवेल रेल्वे स्टेशन, व प्रभाग समिती ‘अ’ मध्ये खारघर रेल्वे स्टेशन व एनएमएमटी बस पार्किंग खांदा कॉलनी येथे या अभियानांतर्गत विशेष स्वच्छता मोहीम घेण्यात आली.

या अभियानांतर्गत कळंबोली येथील मनसे मैदान परिसर येथे विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. मोहीम अंतर्गत प्रभाग क्र १६ चे स्वच्छता दूत व जेट मशीनच्या सहाय्याने मनसे मैदान शेजारील सेक्टर-३ नवीन पनवेल शौचालय आतील व शौचालय परिसर साफ सफाई करण्यात आली. या ठिकाणी साहेब. प्रभाग समिती क कामोठे विभागामध्ये प्रभाग क्रमांक १२ येथील स्वच्छता दुत यांच्या मार्फत खांदेश्वर स्टेशन( ट्रांस्पोर्ट हब)स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

या विशेष स्वच्छता अभियानामध्ये घनकचरा व स्वच्छता विभागाचे विभाग प्रमुख अनिल कोकरे, मुख्य आरोग्य निरीक्षक शैलेश गायकवाड, मुख्य आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे , शौचालय अधीक्षक भावेश चंदने, चारही प्रभागातील सर्व स्वच्छता निरीक्षक, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यापुढेही सातत्याने स्वच्छता मोहिमेचे काम सुरूच राहणार आहे. तसेच या अभियानांतर्गत यापुढेही आठवडा निहाय विविध उपक्रम घेण्यात येणार आहे.



# बीसीटी लॉ कॉलेजला ‘नॅक’चे मानांकन बी+ श्रेणी प्राप्त

पनवेल -जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या पनवेल खांदा कॉलनीतील भागुबाई चांगू ठाकूर (बीसीटी) विधी महाविद्यालयाने राष्ट्रीय मूल्यांकन आणि मानांकन परिषद (नॅक) बंगळुरूकडून बी+ श्रेणी आणि २.६९ सीजीपीएसह मानांकन प्राप्त करून एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. याबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन केले. नॅक तपासणी पथकाने नुकतीच महाविद्यालयाला भेट दिली. या समितीमध्ये अध्यक्ष प्रा. अशोक पाटील (कुलगुरू, नॅशनल युनिव्हर्सिटी ऑफ स्टडी ॲण्ड रिसर्च इन लॉ, रांची), समन्वयक प्रा. सुधांशु रंजन मोहोपात्रा (प्राध्यापक, विधी विभाग, गुरू घासीदास विश्वविद्यालय, छत्तीसगड) आणि सदस्य डॉ. रजनी धिंग्रा (प्राचार्य, महाराजा अग्रसेन व्यवस्थापन संस्था, पश्चिम दिल्ली) यांचा समावेश होता. नॅक तपासणी पथकाने महाविद्यालयाच्या प्रत्येक विभागाला अर्थात प्रशासकीय कार्यालय, ग्रंथालय, परीक्षा कार्यालय, मूट कोर्ट, डीएलएलई कार्यालय, विधी सहाय्य केंद्र, राष्ट्रीय सेवा योजना विभाग येथे भेट देत संबंधित विभागप्रमुखांशी संवाद साधला आणि महाविद्यालयाच्या कार्यप्रणालीवर अहवाल तयार केला, जो नॅक पोर्टलवर अपलोड करण्यात आला. नॅक समिती सात निकषांच्या आधारे उच्च शैक्षणिक संस्थांचे मूल्यांकन आणि मान्यता प्रदान करते. मूल्यमापन निकषांमध्ये अभ्यासक्रमाचे पैलू; अध्यापन-शिक्षण आणि मूल्यमापन; संशोधन, नवकल्पना आणि विस्तार; पायाभूत सुविधा आणि शिक्षण संसाधने; विद्यार्थी समर्थन आणि प्रगती; प्रशासन आणि व्यवस्थापन; मूल्ये आणि सर्वोत्तम पद्धती या संदर्भात तपासणी पथकाने कॉलेजच्या एकूण कामकाज व व्यवस्थापनाचे मूल्यांकन केले आणि २.६९च्या सीजीपीएसह बी+ श्रेणी प्रदान केली.

**लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून अभिनंदन**

# टीम इंडिया परतीच्या मार्गावर

नवी दिल्ली : टी२० विश्वचषक अंतिम सामन्यानंतर रविवारी ( ३० जून) बार्बाडोसमध्ये वादळ धडकले. नागरिकांच्या सुरक्षेसाठी संचारबंदी लागू करण्यात आली होती. त्यामुळे विश्वचषक जिंकल्यानंतर तीन दिवस भारतीय क्रिकेट संघ बार्बाडोसमध्येच अडकून पडला होता. अखेर आज ( दि. ३ जुलै) टीम इंडिया बार्बाडोसहून विशेष चार्टर्ड विमानाने भारताकडे रवाना झाली आहे. रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील संघाचे गुरुवारी (४ जुलै) सकाळी नवी दिल्ली विमानतळावर आगमन होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी सकाळी ११ वाजता भारतीय संघाची भेट घेणार आहेत.

टी२० विश्वचषक २०२४ जिंकल्यानंतर बार्बाडोसमध्ये आलेल्या वादळामुळे भारतीय संघाला रविवारपासून बार्बाडोसमध्ये राहावे लागले. टीम भारतीय संघ तीन दिवस येथील हॉटेलमध्ये अडकला होता. सुरक्षेसाठी कर्फ्यू लावण्यात आला होता. बीसीसीआयने विशेष चार्टर्ड फ्लाइट पाठवून टीम इंडियाच्या मायदेशी परतण्याची व्यवस्था केली.


विश्वविजेत्या भारतीय संघाने रविवारी २९ जून रोजी झालेल्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा ७ धावांनी पराभव केला होता. भारतीय संघाने १७ वर्षांनंतर दुसऱ्यांदा टी-२० विश्वचषक जिंकला. त्याच वेळी, २०१३ नंतर, संघाने एकही ICC ट्रॉफी जिंकलेली नाही. २०२३ मध्ये भारतीय संघाला दोनदा अंतिम फेरीत पराभवाला सामोरे जावे लागले होते.

### भारतीय संघ गुरुवारी दिल्लीला पोहोचणार, पंतप्रधान भेट घेणार

बुधवारी भारतीय संघ बार्बाडोसहून विशेष चार्टर्ड फ्लाइटने भारतात रवाना झाला. टीम इंडियाचे गुरुवार, ४ जुलै रोजी सकाळी ६ वाजता दिल्ली विमानतळावर आगमन होईल. टीम इंडिया सकाळी ९.३० वाजता पंतप्रधान मोदींच्या निवासस्थानी रवाना होईल. येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे टीम इंडियाशी संवाद साधतील.

### मुंबईत होणार १ कि. मी. बस परेड

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भेटीनंतर भारती संघ चार्टर्ड फ्लाइटने मुंबईला रवाना होईल. मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज विमानतळावरून संघ वानखेडे स्टेडियमवर जाईल. त्यानंतर आयकॉनिक स्टेडियमपर्यंत १ किमी लांबीची बस परेड होईल, यानंतर कर्णधार रोहित शर्मा टी२० विश्वचषक ट्रॉफी बीसीसीआय सचिव जय शाह यांच्याकडे सुपूर्द करेल.






# बदाम डिंकाचे फायदे तुम्हाला माहिती आहेत का?

तुम्ही डिंक नावाचा पदार्थ ऐकलाय ना? पण तो हिवाळ्यात खायचा पदार्थ आहे. शरीराचे तापमान थंड ठेवण्यासाटी बदाम डिंक वापरतात. हा डिंक पाण्यात विरघळून किंवा गरम करून नव्हे तर पाण्यात भिजवून खाल्ला जातो. उन्हाळ्यात शीतपेये पिण्याकडे अनेकांचा कला असतो मध्य पूर्व भागात गोंड कतिरा म्हणून ओळखला जाणारा स्फटिकमय पदार्थ उन्हाळ्यात अत्यंत गुणकारी मानला जातो. त्रागासांथ गम म्हणून ओळखला जाणारा हा औषधी डिंक गोड बदामाच्या सालापासून मिळवला जातो.

तुर्कस्तान, इराण या भागात प्रामुख्याने बदाम डिंक सापडतो. प्रकृतीने थंड असणारा हा पदार्थ पाण्याला उत्तम पोत देऊ शकतो त्यामुळे विविध पेयांमध्ये याचा वापर केला जातो.

### बदाम डिंकाचे औषधी उपयोग खालीलप्रमाणे आहेत

- पाण्याची घनता वाढवणे
- पदार्थाची घनता वाढवणे
- पदार्थाचा पोत सुधारणे
- पदार्थाचे स्थैर्य वाढवणे

आहारशास्त्राच्या दृष्टिकोनातून पाहिल्यास तंतुमय पदार्थांनी भरपूर तसेच विविध खनिजांनी युक्त असा बदाम डिंक पोटॅशिअम, कॅल्शिअम, लोह, मॅग्नेशिअम यांनी भरपूर आहे. त्यामुळे विविध आजारांवर उपायकारक आहे.

- उष्माघाताचा प्रभाव कमी करणे
- मलावरोध दूर करणे
- आतड्याचे आरोग्य सुधारणे
- चेहऱ्यावरील सुरकुत्यांचे प्रमाण कमी करणे
- दुग्धजन्य पदार्थांची घनता वाढविणे
- शरीरातील उष्णता कमी करणे
- दमा, अस्थमामुळे होणारे श्वसनाचे त्रास कमी करणे
- ट्रायग्लिसेराईड्सचे वाढीव प्रमाण कमी करणे
- कर्बोदकांचे भरपूर प्रमाण असणारा हा पदार्थ अगदी २-३ ग्राम इतका जरी दिवसभरात वापरला तरी
- शरीरातील उष्णता कमी करणे
- शरीराचे तापमान कमी करणे
- वजन नियंत्रणात ठेवणे
- शरीरातील अतिरिक्त चरबीचे प्रमाण कमी करणे

काही संशोधनानुसार बदाम डिंकामध्ये असणाऱ्या अँटिऑक्सिडंट्स आणि फिनॉलिक द्रव्यांमुळे चयापचय क्रिया पूर्ववत होण्यास मदत होते.

बदाम डिंकाचे सेवन कसे करावे?

- २ -३ ग्राम डिंक २००-३०० मिली पाण्यात भिजवून ठेवावा. त्या पाण्याचा वापर दुधासोबत किंवा इतर द्रव पदार्थासोबत करावा.
- उन्हाळ्यात सरबताबरोबर देखील बदाम डिंक प्यायला जाऊ शकतो.
- फळांच्या रसापासून घरगुती आईस्क्रीम तयार करण्यासाठी बदाम डिंक उपयुक्त आहे.
- जेवणानंतर ताक किंवा जिरेपाणी पिताना त्यातदेखील बदाम डिंक टाकून हे द्रव पदार्थ प्यायले जाऊ शकतात .
- व्यायाम करणाऱ्यांमध्ये व्यायामाआधी २ तास बदाम डिंकाचे पाणी प्यायले जाऊ शकते.
- भाज्यांच्या रसांना जेलीसदृश घनता यावी म्हणून बदाम डिंक वापरला जाऊ शकतो. या उन्हाळ्यात थंडगार बदाम डिंक नक्की प्या आणि स्वास्थ्य सांभाळा.

# राष्ट्रीय डॉक्टर दिनी ‘लाईफलाईन’ चित्रपटाच्या पोस्टरचे अनावरण

जुने रीतिरिवाज आणि आधुनिक विज्ञान यांच्यातील संघर्षावर आधारित ‘लाईफलाईन’ हा चित्रपट लवकरच चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. नुकतेच प्रदर्शित झालेले चित्रपटाचे पोस्टर बघून अशोक सराफ आणि माधव अभ्यंकर या दिग्गजांमधील संघर्षमय जुगलबंदी पाहाण्याची प्रेक्षकांना उत्सुकता लागून राहिली आहे. या चित्रपटात महाराष्ट्रभूषण पुरस्कार प्राप्त महानायक अशोक सराफ एका प्रख्यात डॉक्टरच्या भूमिकेत दिसणार आहेत. त्यामुळे राष्ट्रीय डॉक्टर दिनाचे औचित्य साधत मुंबईत साजऱ्या करण्यात आलेल्या ‘डॉक्टर्स डे सेलिब्रेशन’ या कार्यक्रमात अशोक सराफ यांच्या ‘लाईफलाईन’ चित्रपटातील व्यक्तिरेखेच्या पोस्टरचे अनावरण करण्यात आले. यावेळी देशातील अनेक नामवंत डॉक्टर्स उपस्थित होते. अशोक सराफ यांनी यावेळी डॉक्टरांशी संवाद साधला. या कार्यक्रमात अशोक सराफ आणि डॉक्टर अशी ‘फॅन मुमेंट’ही पाहायला मिळाली. यावेळी डॉक्टरांच्या परिश्रमाचे त्यांनी कौतुक केले, प्रत्येकाच्या आयुष्यात त्यांचे काय महत्व आहे, हे सुद्धा त्यांनी यावेळी विशद केले. तसेच ‘लाईफलाईन’ चित्रपट पाहण्याचे आवाहनही अशोक सराफ यांनी केले.

आपल्या भूमिकेबद्दल आणि राष्ट्रीय डॉक्टर दिनाबद्दल अभिनेते अशोक सराफ म्हणतात, ‘‘ आज या प्रख्यात डॉक्टरांसोबत हा दिवस साजरा करता आला, हे मी माझे सौभाग्य मानतो. माझ्या आगामी चित्रपटामुळे मला हा क्षण अनुभवता आला. ‘लाईफलाईन’ या चित्रपटातील माझी व्यक्तिरेखा या खास दिनानिमित्ताने समोर आली असून मी यात एका डॉक्टरची व्यक्तिरेखा साकारत आहे. मुळात या क्षेत्राबद्दल माझ्या मनात प्रचंड आदर आहे आणि या चित्रपटामुळे हा आदर अधिकच वाढला आहे. ही भूमिका साकारताना मला डॉक्टरांची मेहनत, रुग्णांप्रती असलेली आत्मीयता, त्यांना करावा लागणारा विविध गोष्टींचा सामना, विरोध या सगळ्या गोष्टी मला या व्यक्तिरेखेमुळे अनुभवता आल्या. प्रत्येक गोष्टीमागे काही विज्ञान असते, हे रीतिरिवाजांमध्ये गुरफ़टलेल्यांना पटवून देणे किती जिकिरीचे काम आहे, हे मला या चित्रपटातून समजले.

क्रिसेंडो एंटरटेनमेंट प्रस्तुत, या चित्रपटात अशोक सराफ, माधव अभ्यंकर, हेमांगी कवी, भरत दाभोळकर, जयवंत वाडकर, शर्मिला शिंदे, संध्या कुटे आणि समीरा गुजर यांच्याही महत्वपूर्ण भूमिका आहेत. साहिल शिरवईकर दिग्दर्शित या चित्रपटाचे निर्माते आहेत लालजी जोशी, कविता शिरवईकर, अमी भुता, मिलिंद प्रभुदेसाई, उदय पंडित, संचिता शिरवईकर, संध्या कुलकर्णी, शिल्पा मुडबिद्री आणि क्रिसेंडो एंटरटेनमेंट. राजेश शिरवईकर यांची कथा, पटकथा, संवाद आणि गीत लाभलेल्या या चित्रपटातील गाणी अशोक पत्की यांनी संगीतबद्ध केली असून या भावपूर्ण गाण्यांना अवधूत गुप्ते आणि माधुरी करमरकर ह्यांचा आवाज लाभला आहे. ११ आंतरराष्ट्रीय पुरस्कारांचा मानकरी ठरलेला हा चित्रपट २ ऑगस्ट रोजी प्रदर्शित होणार आहे.

पाचवी व आठवीच्या शिष्यवृत्ती परिक्षा

# नवी मुंबई पालिकेतील ४९ विद्यार्थी गुणवत्ता यादीत

**दिप्ती पाटील ठाणे जिल्ह्यात पहिली तर तनुश्री टावरे नवी मुंबईत पहिली**

नवी मुंबई : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या इयत्ता आठवी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र. ४२, घणसोली येथील विद्यार्थिनी दिप्ती कैलास पाटील ८४.५६ टक्के गुण संपादन करीत संपूर्ण ठाणे जिल्ह्यातील शाळांमधून पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झाली आहे. तिच्या या उल्लेखनीय यशामुळे नवी मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण व्हिजनचा नावलौकिक अधिक उंचावला आहे. यावर्षी नमुंमपा शाळांमधील इयत्ता पाचवीतील २८ व इयत्ता आठवीतील २१ असे एकूण ४९ विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकले असून महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.





यामध्ये नवी मुंबई महापालिका शाळांतून इयत्ता ५ वीतील ५५९ व इयत्ता ८ वीतील ५२१ असे एकूण १०८० विद्यार्थी दोन्ही शिष्यवृत्ती परीक्षेस बसले होते. त्यापैकी इयत्ता ५ वीतील २८ विद्यार्थी व इयत्ता ८ वीतील २१ विद्यार्थी अशाप्रकारे एकूण ४९ विद्यार्थी गुणवत्ता यादीमध्ये झळकले. या विद्यार्थ्यांमधून इयत्ता आठवीच्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती (PSS) परीक्षेमध्ये दिप्ती कैलास पाटील (शाळा क्र.४२, घणसोली) ही विद्यार्थिनी ८४.५६% गुण संपादन करून ठाणे जिल्हयातून व अर्थातच नवी मुंबई क्षेत्रातून सर्वप्रथम क्रमांकाची मानकरी ठरलेली आहे.

तसेच इयत्ता पाचवीच्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये तनुश्री निलेश टावरे (राजर्षी छत्रपती शाहू महाराज विद्यालय शाळा क्र.५५, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, राबाडे) ही विद्यार्थिनी ७८.९१% गुण प्राप्त करून नवी मुंबई क्षेत्रातून सर्वप्रथम आलेली आहे.

या दोन्ही विद्यार्थिनींची व सर्वच गुणवत्तापात्र विद्यार्थ्यांची कामगिरी अभिमानास्पद व कौतुकास्पद असून याव्दारे नवी मुंबई महानगरपालिकेच्या गुणवत्तापूर्ण शैक्षणिक दर्जाचा नावलौकिक उंचावला आहे. महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे, अतिरिक्त आयुक्त शिरीष आरदवाड व शिक्षण विभागाच्या उपआयुक्त श्रीम. संघरत्ना खिल्लारे यांनी शिष्यवृत्तीपत्र विद्यार्थ्यांचे विशेष अभिनंदन केले.

१ लाख कोटींच्या योजनांचा समावेश असलेला

# क्रांतिकारी अर्थसंकल्प : आ. प्रशांत ठाकूर

पनवेल : राज्याचा अर्थसंकल्प खऱ्या अर्थाने महिला, वारकरी, युवक, शेतकरी यांचा सन्मान करून त्यांना मोठे बळ देणारा आहे. १ लाख कोटींच्या योजनांचा समावेश असलेला हा क्रांतिकारी अर्थसंकल्प दुर्बल, गोरगरीब, शेतकरी आणि युवकांचे भविष्य उज्ज्वल करणारा असून महाराष्ट्राला नवी दिशा देणाऱ्या निर्धाराचा अर्थसंकल्प असल्याची प्रतिक्रिया आमदार प्रशांत ठाकूर यांनी आज येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत देत सरकारचे अभिनंदन आणि आभार व्यक्त




**पनवेल तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात झालेल्या या पत्रकार परिषदेस भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, शहर अध्यक्ष अनिल भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी आदी पदाधिकारी उपस्थित होते.**

## अर्थसंकल्पातून सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाच्या विकासासाठी अनेक योजना अंमलात आणत देशाला सक्षम केले त्याचप्रमाणे आता तिसऱ्या पर्वातही काम सुरु आहे. त्याच धर्तीवर राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली सरकार जनतेच्या सर्वांगिण विकासासाठी काम करत आहे. राज्याचे वित्त व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अतिरिक्त अर्थसंकल्पातून महिला, ज्येष्ठ, युवा, शेतकरी, दुर्बल घटकांसाठी विविध योजना सादर करतानाच पायाभूत सुविधा आणि अन्य क्षेत्रातील महत्वाच्या योजना मांडत राज्याच्या विकासावर भर दिला असून या महत्वपूर्ण अर्थसंकल्पातून सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा दिला आहे, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी यावेळी केले.

■ *आमदार प्रशांत ठाकूर यांनी पुढे पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले कि, महिलांसाठी विविध योजना आखत महिलांचे सक्षमीकरण करण्याचे काम सरकारच्या माध्यमातून होत आहे.*

■ *अर्थसंकल्पात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सरकारची महत्त्वाकांक्षी अशी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' जाहीर केली. या योजनेंतर्गत २१ ते ६० वर्षे वयोगटातील पात्र महिलांना राज्य सरकारच्या वतीने महिना १ हजार ५०० रुपये देण्यात येतील. या योजनेसाठी दरवर्षी ४६ हजार कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करण्यात येणार असून योजनेची अंमलबजावणी जुलै २०२४ पासून करण्यात येईल, अशी घोषणा अजित पवार यांनी केली आहे.*

■ *त्या अनुषंगाने पत्रकारांच्या प्रश्नाला उत्तर देताना, महिलांना या योजनेची सविस्तर माहिती व मार्गदर्शन मिळावे यासाठी येत्या रविवारपासून पनवेल, कळंबोली, खांदा कॉलनी, कामोठे, खारघर येथील भाजप जनसंपर्क कार्यालयात महिला पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येणार असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले.*

■ *अर्थसंकल्पात वारकरी बांधवांसाठी तरतूद करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने पंढरपूरच्या वारीचा जागतिक वारसा नामांकनासाठी युनेस्कोकडे प्रस्ताव, पंढरपूरच्या वारीला जाणाऱ्या मुख्य पालख्यांतील दिंड्यांना प्रति दिंडी २० हजार रुपये, 'निर्मल वारी'साठी ३६ कोटी ७१ लाख रुपयांचा निधी, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाच्या माध्यमातून देहू-आळंदी ते पंढरपूर या दोन्ही मुख्य पालखी मार्गावरील सर्व वारकऱ्यांची आरोग्य तपासणी, मोफत औषधोपचार देण्यात येणार आहे.*

■ *शेतकऱ्यांसाठी विविध योजना आखण्यात आल्या असून 'गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजने'अंतर्गत २ हजार ६९४ शेतकरी कुटुंबांना ५२ कोटी ८२ लाख रुपयांचे अनुदान वाटप, कांदा उत्पादकांसाठी फिरता निधी, दूध उत्पादक शेतकऱ्यांना आधार देण्याकरिता प्रतिलिटर पाच रुपयांप्रमाणे अनुदान देण्याची योजना जुलै, २०२४ पासून पुढे चालू ठेवण्यात येणार आहे.*

राज्यात गाव तिथे गोदाम, तसेच कापूस, सोयाबीन शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी ५०० रुपये देण्यात येणार आहेत. गाईच्या दुधासाठी ५ रुपयाचे अनुदान प्रति लिटर देण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे १ जुलैपासून हे अनुदान दिले जाणार आहे. त्याचबरोबर आशा वर्कर, कोतवाल, पोलीस पाटील, अंगणवाडी सेविका यांच्या वेतनात भरीव वाढ या अतिरिक्त अर्थसंकल्पात करण्यात आली असून सर्वजन हिताय सर्वजन सुखाय अशा प्रकारचा अर्थसंकल्प अजितदादांनी सादर केला आहे. शेतकरी, महिला, युवा, मागासवर्गीय, अल्पसंख्यांक अशा सर्व महत्त्वाच्या घटकांना दिलासा देणारा अशा प्रकारचा अर्थसंकल्प आहे. पंतप्रधान मोदींच्या गरीब कल्याणाच्या धोरणाला पुढे नेणारा, निर्धाराला पुढे नेणारा, महाराष्ट्राला पुढे नेणारा अर्थसंकल्प आहे, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी अधोरेखित केले.



## रघुनाथ गोलवड यांची पोलीस उपनिरीक्षकपदी बढती

पालघर : पालघर जिल्ह्यातील जव्हार या आदिवासी बहूल तालुक्यातील मेढा या गावचे सुपूत्र रघुनाथ सखाराम गोलवड हे अत्यंत हालाखीच्या प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत शिक्षण घेवून पोलीस दलात रुजू झाले. रघुनाथ गोलवड हे आदिवासी समाजातील असून त्यांची सर्व सामान्यांप्रमाणे श्रध्दाळू असून सर्वांसाठी सर्वतोपरी सहकार्याची आणि परोपकाराची नेहमीच भुमिका असते. नुकतीच त्यांची भिवंडी येथे वाहतूक विभागात पोलीस उपनिरीक्षक म्हणून बढती मिळाली आहे. त्यांच्या पदोन्नतीने आप्तेष्ट, नातेवाईक, मित्र तसेच सर्व स्तरांवरुन अभिनंदन आणि कौतुकांचा त्यांचावर वर्षावर होत आहे.

धर्मवीर आनंद दिघे तरणतलाव १५ ऑगस्टपर्यत कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने

# तातडीने सर्व कामे पूर्ण करावीत : आयुक्त सौरभ राव यांचे निर्देश

ठाणे (गणेश भोईटे) : महापालिकेच्या माध्यमातून बाळकूम येथे बांधण्यात आलेल्या धर्मवीर आनंद दिघे तरणतलाव येथे आवश्यक असलेली सर्व स्थापत्य कामे ही १० ऑगस्ट २०२४ पर्यत पूर्ण करुन तरणतलाव १५ ऑगस्टपर्यत नागरिकांसाठी खुला करण्यात यावा असे निर्देश महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी संबंधित अधिकाऱ्यांना मंगळवारी झालेल्या पाहणीच्यादरम्यान दिले.

मंगळवारी (२ जुलै) आयुक्त सौरभ राव यांनी बाळकूम येथील धर्मवीर आनंद दिघे तरणतलाव, ढोकाळी येथील शरदचंद्रजी मिनी स्टेडियम व कोलशेत येथील सुविधा भूखंडाची पाहणी केली. यावेळी अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे, उपायुक्त क्रीडा मीनल पालांडे, माजी नगरसेवक देवराम भोईर, संजय भोईर, उषा भोईर आदी उपस्थित होते.



बाळकूम, कोलशेत आदी परिसरातील नागरिकांच्या सोयीसाठी धर्मवीर आनंद दिघे तरण तलाव महापालिकेच्या माध्यमातून बांधण्यात आला आहे. सदर तरणतलाव अद्याप नागरिकांसाठी खुला झाला नसल्याने तो लवकर खुला करावी अशी मागणी सातत्याने परिसरातील नागरिकांकडून होत आहे. या पार्श्वभूमीवर आयुक्तांनी या तरणतलावाची पाहणी करुन कामाचा आढावा घेत या ठिकाणी अपूर्ण अवस्थेत असलेली सर्व कामे लवकरात लवकर पूर्ण करावीत असे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. तळमजला अधिक चार मजल्याची ही इमारत असून इमारतीच्या लिफ्टचे काम हे सप्टेंबरपर्यत पूर्ण होईल असे संबंधित ठेकेदारांकडून सांगण्यात आले. परंतु तत्पूर्वी तरणतलावाची सर्व कामे पूर्ण करुन सदर तरणतलाव १५ ऑगस्ट रोजी नागरिकांसाठी खुला करावा असेही आयुक्तांनी नमूद केले. तसेच या ठिकाणी लहान मुलांसाठी बेबी पूलची मागणीही नागरिकांकडून होत असल्याचे माजी नगरसेवक संजय भोईर यांनी आयुक्तांच्या निदर्शनास आणून दिले. याबाबत आवश्यक बदल करुन मार्ग काढण्यात येईल असेही आयुक्त सौरभ राव यांनी नमूद केले.

ढोकाळी येथील शरदचंद्रजी मिनी स्टेडियमची पाहणी ही आयुक्तांनी केली. या स्टेडियममध्ये असलेल्या बॅडमिंटन कोर्टच्या छताचे वॉटरप्रुफींगचे काम तातडीने करण्यात यावे., तसेच इमारतीला लावण्यात आलेल्या टाईल्स या उखडलेल्या अवस्थेत असून त्याची दुरुस्ती करावी, तसेच ज्या ठिकाणी गळती होते त्या ठिकाणची दुरूस्ती करण्याच्या सूचनाही आयुक्त राव यांनी यावेळी दिल्या. यावेळी उपहार गृह, प्रशासकीय कार्यालय आदींची देखील पाहणी करण्यात आली.

## ठाणे स्थानकातील ३४ कॅमेरे बंद

ठाणे : प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून ठाणे रेल्वे स्थानकात फलाटांवर लावण्यात आलेल्या १७० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांपैकी ३४ कॅमेरे गेले अनेक आठवडे बंद असल्याची बाब उघडकीस आली आहे. सीसीटीव्ही कॅमेरे नसलेल्या भागात कोणतीही दुर्घटना, अपघात वा गैरप्रकार झाल्यास याचे चित्रीकरण मिळवण्यात पोलिसांना अडचणी येण्याची शक्यता आहे. दीड वर्षांपूर्वी लोहमार्ग पोलिसांनी रेल्वे प्रशासनाकडे स्थानकात ५० सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याची मागणी केली होती. तीही अद्याप पूर्ण करण्यात आलेली नाही. याबाबत मध्य रेल्वेच्या जनसंपर्क विभागाशी संपर्क साधला असता तो होऊ शकला नाही. ठाणे स्थानकात रोज सुमारे सात लाख प्रवासी ये-जा करतात. उपनगरीय रेल्वेगाड्यांसह रोज अडीचशेहून अधिक लांब पल्ल्याच्या गाड्या सुटतात.

## डोंबिवलीतील डिलक्स दारू विक्री; दुकानाला बंदची नोटीस

डोंबिवली : डोंबिवली पूर्व रेल्वे स्थानकाजवळील पाटकर रस्त्यावरील डिलक्स दारू विक्री दुकानासमोरच ग्राहक दारू पिऊन धिंगाणा घालत होते. सर्वाधिक वर्दळीच्या रस्त्यावर हा प्रकार अनेक वर्ष सुरू होता. महिला वर्गाला या रस्त्यावरून जाताना त्रास होत होता. याप्रकरणी आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांच्याकडे अनेक महिलांनी तक्रारी केल्या होत्या. या तक्रारींच्या अनुषंगाने आयुक्त डॉ. जाखड यांनी अधिकाऱ्यांना संबंधित दारू विक्रेता आणि उघड्यावर दारू पिऊन धिंगाणा घालणाऱ्यांवर कारवाईचे आदेश मंगळवारी दिले होते. आयुक्त डॉ. जाखड यांच्या आदेशावरून परिमंडळ उपायुक्त रमेश मिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली फ प्रभागाचे साहाय्यक आयुक्त भारत पवार, ग प्रभागाचे साहाय्यक आयुक्त संजयकुमार कुमावत, साहाय्यक आयुक्त हेमा मुंबरकर आणि रामनगर पोलीस ठाण्याचे पोलीस यांनी मंगळवारी रात्री अचानक डोंबिवली पूर्वेतील डिलक्स दारू विक्री दुकानासमोर उघड्यावर दारू पिण्यास बसलेल्या, या ग्राहकांना खाद्य पदार्थ पुरविणाऱ्या हातगाडींवरील विक्रेत्यांना कारवाई केली. उघड्यावर दारू पिण्यासाठी ग्राहकांनी दुकाना समोरील बाजुला कट्टे केले होते. या कट्ट्यावर ग्राहक मंगळवारी रात्री आठ वाजता दारू पिण्यास बसले असताना रामनगर पोलिसांनी ग्राहकांना प्रसाद देऊन त्यांना तेथून पिटाळून लावले. या ग्राहकांना अंडी, बुरजी पाव, इतर तिखट पदार्थ पुरविणाऱ्या आठ हातगाड्यांवर फ प्रभागाचे साहाय्यक आयुक्त भारत पवार यांनी जप्तीची कारवाई केली. दारू पिऊन ग्राहक पाटकर रस्त्यावरून येजा करणाऱ्या महिलांची छेड काढत होते. अनेक वर्ष हा प्रकार पाटकर रस्त्यावरील दारू विक्री दुकानासमोर सुरू होता.

## ३२७ कोटी रुपयांचे अमली पदार्थ जप्त

भाईंदर : देशभरात अमली पदार्थांची निर्मिती करून विक्री करणाऱ्या एका मोठ्या टोळीचा पर्दाफाश करण्यास मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयाला मध्यवर्ती गुन्हे शाखेला यश आले आहे. एकूण ३२७ कोटीचा साठा जप्त करून १५ जणांना आता पर्यंत अटक करण्यात आली आहे. ही टोळी आंतरराष्ट्रीय दहशतवादी दाऊद इब्राहिमचा म्होरक्या सलीम डोळा चालवत असल्याचे निष्पन्न झाले आहे. लोकसभा निवडणूक आचारसंहिता कालावधीत पोलिसांकडून शहरात नाकाबंदी राबवण्यात येत होती. यावेळी १५ मे रोजी शोएब मेमन व निकोलस हे दोन व्यक्ती अमली पदार्थांची विक्री करण्यासाठी मिरा भाईंदर मध्ये येत असल्याची गुप्त माहिती गुन्हे शाखा १ चे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अविराज कुराडे यांना मिळाली होती. त्यावरून पोलीसांनी घोडबंदर येथील चेना भागात सापळा रचून आरोपीना ताब्यात घेतले. यात आरोपीकडून दोन कोटी किंमतीचे जवळपास एक किलो एमडी ड्रग्स पोलिसांना मिळाले होते. सदर आरोपींची पोलीस चौकशी केली असता आरोपीना तेलंगणा येथून हे अमली पदार्थ आल्याचे माहिती समोर आली .त्यामुळे हा अमली पदार्थ साठा तयार करणाऱ्या टोळीला ताब्यात घेण्यासाठी पोलिसांचे एक पथक तेलंगणा येथील विकाराबाद जिल्ह्यात गेले. यातून नासिर उर्फ बाबा शेख आणि दयानंद उर्फ दया माणिक या आरोपीना अटक करून २५ कोटी किंमतीचे एम. डी आणि कारखाना पोलिसांनी जप्त केला होता.

यावेळी अधिक तपास केला असता अमली पदार्थांची मोठी टोळी सक्रिय असलेले पोलिसांच्या निदर्शनास आले. त्यावरून वाराणसी, महाराष्ट्र , आणि गुजरात येथे शोध मोहीम राबवून अन्य आरोपींना ताब्यात घेण्यात आले. मुख्य सूत्रधार आंतरराष्ट्रीय दहशतवादी दाऊद इब्राहिमचा मोरक्या सलीम डोळा असल्याचे स्पष्ट झाले आहे.तर चौकशीअंती पोलिससांनी एकूण १५ आरोपीना अटक करून एकूण ३२७ किंमतीचे एम. डी जप्त केले. याशिवाय आरोपीकडून तीन पिस्तूल, एक रिवाल्वर आणि ३३ जिवंत काढत असे देखील हस्तगत करण्यात आले आहे.

# अनधिकृत हॉटेल, बार वर भिवंडी मनपाकडून धडक कारवाई सुरू




भिवंडी : अनधिकृत पब, हुक्का पार्लर व बार व अमली पदार्थ विक्री करणारे अवैध बांधकाम निष्कासित करण्याबाबत माननीय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेल्या निर्देशानुसार भिवंडी महानगरपालिका कार्यक्षेत्रात असलेले अनेक अनधिकृत बार रेस्टॉरंट आणि देशी बार वरती मार्केट आणि अग्निशमन विभागाकडून संयुक्त कारवाई करण्याचे आदेश पालिका आयुक्त अजय वैद्य यांनी सर्व संबंधित विभागाला दिले आहेत. मनपा कार्य क्षेत्रात व्यवसाय करण्याऱ्या दुकानदारानी व्यवसाय परवाना आणि अग्निशमन दाखला घेणे अनिवार्य असून देखील आजपर्यंत ३५ बार रेस्टॉरंट आणि देशीबार २० अनधिकृत हॉटेल, बार चालू असल्याने प्रकाश राठोड परवाना विभाग प्रमुख आणि नितिन चव्हाण, अग्निशमन अधिकारी मनपा पथकाकडून कारवाई नोटीस देऊन करण्यात आली सदर कार्यवाही निरंतर चालू ठेवणार असून जर परवाने नाही घेतले तर बार रेस्टॉरंट आणि देशीबार बंद करण्याची कारवाई करण्यात येणार आहे, असा असा इशारा पालिका आयुक्त अजय वैद्य यांनी दिला आहे.

कल्याण-डोंबिवली पालिकेच्या क्रीडा व सांस्कृतिक विभागामार्फत शासनाच्या

# ६३ व्या सुब्रतो मुखर्जी फुटबॉल कप स्पर्धेचे आयोजन



कल्याण : क्रीडा व युवक सेवा संचालनालय, मुंबई, जिल्हा क्रीडा परिषद, ठाणे व कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने ६३ व्या सुब्रतो मुखर्जी फुटबॉल कप सन २०२४-२५ सब ज्युनिअर /ज्युनिअर मुले व मुलींच्या स्पर्धेचे आयोजन दि.०३/०७/२०२४ ते दि. ०६/०७/२०२४ या कालावधीत शहाड पश्चिम येथील सेंच्युरी रेयॉन कंपनीच्या मैदानावर करण्यात आलेले आहे. या स्पर्धेचा शुभारंभ महापालिका आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त-१ प्रल्हाद रोडे व अतिरिक्त आयुक्त-२ धैर्यशील जाधव यांचे हस्ते करण्यात आला.

सदर स्पर्धेत एकुण ५८ संघ सहभागी होत आहेत. आजचा पहिला सामना सेंट्रल रेल्वे, (कल्याण प.) विरुध्द सेंट मेरी हायस्कुल, चक्की नाका मुलींचा संघ यामध्ये खेळविण्यात आला. या सामन्यामध्ये सेंट मेरी हायस्कुल या संघाने विजय मिळविला. आज दिवसभरात एकुण १२ सामने खेळविले जाणार आहेत. आजच्या शुभारंभाच्या सामन्यासमयी अतिरिक्त आयुक्त प्रल्हाद रोडे व धैर्यशील जाधव यांनी उपस्थित खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. यावेळी क्रीडा व सांस्कृतिक विभागाच्या नोडल अधिकारी तथा सहा. आयुक्त स्नेहा करपे,क्रीडा व सांस्कृतिक विभागाचे पर्यवेक्षक प्रविण कांबळे, कृष्णा बनगर, क्रीष्णा माळी, दशरथ भांडे, थॉमस सर, अविनाश ओंबासे इ.क्रीडा शिक्षक, स्पर्धेत सहभागी होणाऱ्या मुलींचे संघ आणि शिक्षण व क्रीडा विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# जून महिन्यातील १३ सेवानिवृत्त नमुंमपा अधिकारी, कर्मचारी यांचा सन्मान

नवी मुंबई : नवी मुंबई महानगरपालिकेतील प्रत्येक अधिकारी-कर्मचारी यांनी आपल्या पदाची जबाबदारी चांगल्या रितीने पार पाडल्यामुळेच आज नवी मुंबईचा नावलौकिक सर्वत्र आहे. त्याचप्रमाणे सेवानिवृत्ती समारंभात अधिकाऱ्यापासून चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यापर्यंत सर्वांना समान न्याय देत नवी मुंबई महानगरपालिकेने इतरांनी अनुकरण करावा असा पायंडा पाडला असल्याचे मत अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांनी व्यक्त केले. सेवानिवृत्तीच्या दिवशीच नमुंमपा अधिकारी, कर्मचारी यांना सेवेचे देय्य लाभ मिळावेत अशा प्रकारच्या महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी दिलेल्या निर्देशानुसार प्रशासनाने कार्यवाही पूर्ण केली असल्याचा विशेष उल्लेख त्यांनी मनोगतात केला.



माहे जून २०२४ मध्ये सेवानिवृत्त होणाऱ्या १३ अधिकारी, कर्मचारी व शिक्षक यांच्या मुख्यालयातील ज्ञानकेंद्रात संपन्न झालेल्या सेवानिवृत्ती समारंभ प्रसंगी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांनी शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले. यावेळी प्रशासन विभागाचे उपआयुक्त शरद पवार, समाजविकास विभागाचे उपआयुक्त किसनराव पलांडे, महापालिका सचिव श्रीम. चित्रा बाविस्कर, अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

जून २०२४ मध्ये सेवानिवृत्त होणारे कार्यकारी अभियंता गिरीश गुमास्ते व जयकुमार चिंचोळे, मुख्याध्यापक इंद्रप्रकाश पाल, अग्निशमन केंद्र अधिकारी जगदीश पाटील व सहा.अग्निशमन केंद्र अधिकारी विजय शेडगे, स्वच्छता अधिकारी दिनेश वाघुळदे, प्राथमिक शिक्षिका श्रीम.छाया पाटील, वरिष्ठ लिपिक मोहन पाटील, आरोग्य सहाय्यक भूषण ढबाळे व अनिल पाटील, आरोग्य सहाय्यक (महिला) श्रीम.केरबिन डिसोझा व श्रीम.नम्रता गायकवाड आणि वाहनचालक अशोक पाटील अशा १३ अधिकारी, कर्मचारी व शिक्षक यांना मान्यवरांच्या शुभहस्ते शाल, पुष्पगुच्छे व सन्मानचिन्हे प्रदान करण्यात आली. याप्रसंगी अनेक अधिकारी, कर्मचारी यांनी मनोगते व्यक्त करीत सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी, कर्मचारी यांच्यासोबतचे अनुभव कथन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. सत्कारमुर्तींच्या वतीने प्रातिनिधीक स्वरूपात कार्यकारी अभियंता श्री.गिरिष गुमास्ते यांनी मनोगत व्यक्त केले व सत्काराबद्दल आभार मानले.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर - डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई - ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम - ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक - चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१